दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक


सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

रविवार पुरवणी ६ ऑक्टोबर २०२४


## जागर कोणाचा? कोणासाठी? कशासाठी?


श्री. निकेत नरहरी पावसकर, तळेरे,
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग. 41680


नवरात्रौत्सव आता ग्रामीण भागातही फोफावलाय, हो असेच म्हटले तर वावगे ठरु नये. कारण, तशाच प्रकारची स्थिती अलिकडच्या काही वर्षात दिसू लागली आहे. गावागावातील अनेक ठिकाणी रात्री आता आधुनिक पध्दतीने मोठा गाजावाजा करत जागविल्या जातात. अर्थात, विजेच्या झगमगाटात, हिंदी गाण्यांच्या तालावर नृत्य केले जाते. तिथे हिंदू धर्मात पारंपारिकतेने चालत आलेल्या धार्मिकतेला कुठेतरी छेद जांत असल्याचे दिसून येते. अशावेळी जागर कोणाचा, कोणासाठी आणि कशासाठी केला जातो ? असा प्रश्न नेहमीच पडतो. यासाठी तरुण पिढीने आता सजग होऊन शाश्वत कार्य केले पाहिजे.



नवरात्रौत्सवाचे नऊ दिवस विविध ठिकाणी गरबा आणि दांडिया नृत्य हिंदी गीतांच्या तालावर आयोजित केले जाते. त्यामध्ये युवा पिढी नवरात्रौत्सवाचा आनंद लूटत आधुनिक पध्दतीने जागर करत असतात. काही वर्षे तुरळक ठिकाणी आढळणारा हा कार्यक्रम आता आपली संस्कृतीच बनतो की काय? असा प्रश्नदेखील पडतो. अलीकडल्या काही वर्षात प्रत्येक गावागावात अशा विविध संस्था आणि मंडळे कार्य करताना दिसतात. गावागावात अनेक मंडळे आता काम करुन लागलीत. मात्र काहींना अजून योग्य दिशा मिळालेली देखील नाही. विशेष म्हणजे जिथे प्रसिध्दी मिळेल, ज्यातून भव्यदिव्यता दिसून येईल अशाच कार्यक्रमांचे आयोजन बहुतांशी करण्यात येत असल्याचे प्रकर्षाने जाणवते. त्यांच्यामागे राजकीय वरदहस्त असतो. नव्हे अशा राजकीय नेत्याला मतांची आवश्यकता असते. आणि त्या मंडळाला आर्थिक सहकार्याची, त्यामुळे "एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ" अशा पध्दतीनेच त्यांचे काम सुरु असते.

खरे तर अशी मंडळे ही सामाजिकता जोपासण्यासाठी सुरु केली जातात. मात्र, त्यांचे कार्य दिशाहिनच असल्याचे दिसून येते. नवरात्रौत्सवाचे नऊ दिवस करोडो रुपये खर्च केले जातात. त्या झगमगाटामागच्या दुर्लक्षित, दुर्बल समाजाचा काळोख खर तर कोणीच पाहत नाही. समाजातील दुर्बल घटकांकडे नेहमीच दुर्लक्ष केले जाते. खर तर हिंदू धर्मातील अशा विविध निमित्ताने सामाजिकता जोपासण्याची संधी नेहमीच असते. मात्र, बदलत्या मानसिकतेमुळे डीजेच्या तालावर नाच आणि हिंदी गाण्यांच्या बोलावर विकृत हावभाव करणाऱ्या या तरुण पिढीकडून शाश्वत कार्याची केवळ अपेक्षाच ठेवण्यापलीकडे हाती काहीच लागत नाही.

बदलती सामाजिक स्थिती पाहता आता सामाजिकता, सामाजिक कार्य, समाजसेवा या शब्दांची धार कमी झाली की काय? असा प्रश्न पडतो.

कारण, या शब्दांचा वापर कुठेही आणि कसाही केला जातो. आपल्याकडे अनेक संस्था, ट्रस्ट हे सामाजिकता जोपासण्यासाठी प्रामुख्याने स्थापन केले जातात. परंतु, कित्येक वर्षे कार्य करुनही गरीबी, अज्ञान, अंधश्रध्दा, अशिक्षित अशा अनेक प्रकारचे दानव समाजाच्या उरावर वर्षानुवर्ष बसलेले आहेतच. या नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने यातील एका तरी विषयाला हात घालून त्याचे निरसन केले जात असल्याचे चैतन्याचा जागर केला पाहिजे.

दिसून येत नाही. हजारो रुपये सोडाच साधी मदत देखिल करताना दिसत नाही. आणि दुसरीकडे मात्र, या नवरात्रौत्सवाला वीजांचा झगमगाट, प्रत्येकजण नृत्यासाठी खरेदी करीत असलेले नवनवीन कपडे व इतर साहित्य, सेलिब्रिटींना बोलावून त्यांच्यावर करण्यात येणारा खर्च या सर्वाचा मेळ घातला तर करोडो रुपये सहज खर्च केले जातात. मात्र, हा खर्च अनाठायी असल्याचे कोणालाच ज्ञात नसावे का? एवढा साधा विचारही तरुण पिढी करीत नाही का?

म्हणजेच सामाजिकतेच्या नावाखाली सामाजिकता जोपासणारी मंडळे कमी आणि केवळ नावासाठी, प्रसिध्दीसाठी (दिशाहिन) काम करणारीच मंडळे जास्त असल्याचे दिसून येते.

अर्थात, अशा कार्यक्रमांमागे काही महिन्यांचे नियोजन, व्यवस्थापन आणि अथक प्रयत्न निश्चितच असतात. मात्र, हीच शक्ती एका चांगल्या आणि विधायक कामासाठी वापरली तर नक्कीच समाजातील अस्थिरता कमी होईल. गरीब - श्रीमंत दरी कमी होईल.

सामाजिक मंडळे यांची बहुसंख्येने वाढ होतानाच काही समस्या ह्या कमी न होताच वाढतच असल्याचे दिसून येते. जागर करायचाच असेल तर अशा समस्या निपटून टाकण्यासाठी जागर केला पाहिजे. समाजातील दुर्बलातील दुर्बल घटकाला आपणही समाजातच राहतो याची जाणीव होईल अशांसाठी जागर केला पाहिजे. दैवी शक्ती अफाट, अदभुत आणि अद्वितीय आहे, त्यामुळे शाश्वत व कालानुरूप प्रत्येक विषयाचे गांभीर्य बदलत चालले आहे. त्याचप्रमाणे समस्याही बदलत चाललेल्या आहेत.

**आपण आपली संस्कृती टिकवताना समाजही पुढे जातोय ना याकडे कटाक्ष असलाच पाहिजे. अलीकडे अशा अनेक कार्यक्रमात युवाशक्ती मोठ्या प्रमाणात सहभागी झालेली दिसते. या युवाशक्तीचा वापर अशा सामाजोपयोगी उपक्रमांसाठी झाल्यास समाजातील दरी कमी होण्यास वेळ लागणार नाही. अर्थात, त्यासाठीही राजकीय इच्छाशक्तीचा कटाक्षाने बीमोड करणे क्रमप्राप्त ठरेल.**



**'कायद्याचे बोलूया!'**

समाजात वावरताना आवश्यक कायदे व त्यासंबंधीची प्राथमिक माहिती प्रत्येक सर्वसामान्य नागरिकास असायला हवी या उद्देशाने **ठाणे, मुंबई येथील विख्यात विधितज्ज्ञ, प्रथितयश लेखक, वकील व नोटरी असलेले श्रीनिवास भार्गवराम घैसास** हे दै. सिंधुदुर्ग समाचारच्या वाचकांसाठी 'कायद्याचे बोलूया!' ही साप्ताहिक लेखमाला घेऊन येत आहेत. सिंधुदुर्ग समाचारचे सर्व वाचक व संपूर्ण समाजालाच या सदराचा फार मोठा उपयोग होईल अशी खात्री आहे.

# म्हाळ मात्र जोरात घालतो!



## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.

बाजी इयत्ता बारावीपर्यंतचं शिक्षण गावात पूर्ण करून कोणा मावळ्याच्या ओळखीने पोटापाण्यासाठी म्हणून रातराणीच्या मुंबई गाडीत बसला. बाजी आता सतरा अठरा वर्षे वयाचा गडी, पण आजवर कधीच घराबाहेर, दूर राहिला नव्हता. पोटापाण्यासाठी घर सोडताना बाजीला अगदी भरून आलं. बाजीचा डबडबलेला चेहरा बघून बाजीच्या आयेलाही तसंच भरून आलं. बाजी खांद्यावरील बोजा संभाळीत गाडीत बसला तेव्हा बाजीचा बाबा बाजीला कडकडून भेटला. "बाजी, सवकास जा, पोचल्यार फोन कर, पत्र पाठवीत ऱ्हव..." कसेबसे एवढंच बोलून तो खाली उतरला. मास्तराने डबल बेल मारली नि गाडी मुंबईकडे निघाली तेव्हा बाजीची आये, बाबा कितीतरी वेळपर्यंत त्या पाठमोऱ्या नि धुरळा उडवीत गेलेल्या गाडीकडे बघत राहीले.

तिकडे मुंबईत मावळ्याकडे बाजी रमून गेला तरी मुलखात बाजीच्या आये, बाबाच्या जीवाची घालमेल मात्र होतच राहिली. दोघांचंही अन्न-पाणी कमी होत गेलं. बाजीच्या आठवणीने दोघेही झुरत गेले म्हणा ना. मावळ्याच्या 'शेट'च्या वशिल्याने बाजीला त्याच्या शिक्षणाच्या मानाने चांगली नोकरी मिळाली. नाहीतरी हल्ली शिक्षणाला विचारतोय कोण? मुंबईत बघावं तर पदवीधर, पदव्युत्तरही कुठे कुठे चपराश्याची नोकरी करताहेत. त्या काळात आताच्या सारखे ना मोबाईल फोन, ना घरोघरी टेलिफोन. त्यामुळे कधीतरी येणारे बाजीचे खुशालीचे पत्र हाच बाजीच्या आये बाबासाठी संपर्काचा आधार होता. त्यातच बाजी प्रत्येक पत्रात लिहायचा," शेटचो माझ्यार लय जीव. शेटचो माझ्यार लय विश्वास. शेटचा खायचाच काम माझ्याशिवाय होणा नाय. मुलखात येवचा वाटता, पण शेट सुट्टीच देणा नाय." वगैरे, वगैरे. पुढे पुढे तर बाजीने नोकरी करता करता मावळ्याचीच छोकरी पटवली. लग्नाची वेळ आली तेव्हा ना मावळ्याने आडकाठी केली, ना बाजीच्या आयेने नाक मुरडलं. "आपल्याच नात्यातला, घसमटीतला पोरग्या आसा. आसांदे, म्हातारपणी आमका दूर नाय लोटूचा. आपुलकेन आरतें वढतला..." असे म्हणत बाजीची आये तर 'सुनमुख' पाहून भलतीच खुश झाली.

लग्नानंतर बाजीने त्याच्या बायकोला मुलखात आये बाबाकडे ठेवावे अशी म्हातारा-म्हातारीची इच्छा होती. मात्र त्यामुळे आपल्या झीलाच्या जेवणाची आबाळ नको, त्याचे हाल व्हायला नको हा विचार करून बाजीची आयेच बाजीला म्हणाली," आमचे हातपाय चलतंहत तवसर आम्ही आमचा बघू. वगीच तुझ्या पोटाचे हाल नको. तू आपलो तुझ्या बायलेक मुंबैक घेव्न जा. सुमाराकशी खोली घे सुमाराकशी खोली घे आणि सुखान संसार करा. कधीमधी येव्न आमकां बघून जावा म्हणजे झाला." अगदी जवळच्या नात्यातली असली तरी बाजीची बायको ना कधी बाजीच्या मुलखात येऊन राहिली, ना तिने कधी बाजीच्या आये बाबाची कसली सेवा केली. एका वर्षी पोराचा संसार बघायला म्हणून बाजीची आये बाबा दिवाळीत मुंबईत गेले तर त्यांच्या गावंढळपणावर राग करीत ती बया दोघा म्हातारा- म्हातारीला बाजीच्या समक्षच अद्वातद्वा बोलली! म्हातारा- म्हातारी आयुष्यभर गरीब राहिले. पण ते आयुष्यभर स्वाभिमानीही राहिले. त्यांनी उभ्या आयुष्यात कधी कुणाची लाचारी केली नाही. लाजिरवाणं जीणं जगले नाहीत. दुसऱ्याच दिवशी म्हातारा- म्हातारी कोकण रेल्वेत बसले. बाजीदेखील गुमान त्यांना रेल्वेत बसवायला दिव्यापर्यंत आला. बाजीच्या गालांचा मुका घेत आये, बाबा दोघेही फलाटावरच ओक्साबोक्सी रडले. बाजीचा विरह, सुनेचं वागणं म्हातारा- म्हातारीला आवडलं नाही. परत मुंबईत पाय ठेवायचा नाही असं मनाशी ठाम ठरवून दोघंही मुलखात परतली. बाजी तसा म्हातारा- म्हातारीचा एकुलता एक मुलगा. प्रसंगी पोटाला चिमटे काढून, स्वतः उपाशी राहून त्यांनी बाजीला वाढवलं. पण बाजीने त्यांची जाण ठेवली नाही. म्हातारा- म्हातारी मुलखात अस्थिपंजर, जर्जर होत गेली तरी तो मात्र तिकडे त्याच्या प्रपंचात मस्त रमून गेला. बायको, दोन मुलांपुढे त्याला आये बाबाची मुळी ओढच राहिली नाही.

साधारण दहा बारा वर्षांपूर्वी एका श्रावण सोमवारी भल्या पहाटे कधीतरी बाजीची आये, बाबा, दोघांनीही कसे काय जाणे, एकाच वेळेस अखेरचा श्वास घेतला. शेजारचा अण्णा दरदिवशी प्रमाणे कपभर चहा घेऊन म्हाताऱ्याला साद घालत आला नि पाहतो तर, दोघांचेही 'लाकूड' झालेले! अण्णानेच मग बाजीला फोन करून मुलखात बोलावून घेतले. बाजी, त्याची बायको म्हातारा- म्हातारीच्या कलेवरांना कवटाळून ऊर बडवून बडवून रड रड रडली. पुढे बाजीने म्हातारा- म्हातारीचे दिवसकार्य, श्राद्ध मोठ्या धडाक्यात केले. श्राद्धाला तर अख्ख्या गावाला जेवण घातलं. त्या वर्षापासून दरवर्षी पितृपक्षात बाजी मुंबईतल्या खोलीत आये बाबा, पितरांच्या नावाने मोठा म्हाळ घालतो. मित्रमंडळी, नातेवाईक, जेवणकार बोलावतो. जेवणावळी झडतात, नंतर प्रत्येकास आये बाबाची आठवण म्हणून एखादी भेटवस्तूही देतो. सध्याचा पितृपक्ष म्हणून परवा अगदी सहजच बाजीला फोन केला. मी काही विचारायच्या आधीच तो म्हणाला," काल लय बरं वाटलं यार! आये बाबाची द्वादशीची तिथी ना, म्हणून कालच म्हाळ घातलंय. पन्नाशेक माणसा जेव्न गेली. जेवणकारांक खुश केलंय. हल्ली या पितृपक्षात दररोज सकाळी कावळो येव्न काव काव करता. आये बाबा काल खुश झाले असतले म्हाळ बघून." बोलता बोलता बाजीचा फोन कदाचित त्याच्या आता वृद्धत्वाकडे झुकलेल्या मावळ्याने घेतला. तो अगदी प्रसन्न मनाने मला म्हणाला," गांवकरानु, बाजी भाग्यवान आसा. तेच्यार तेच्या आये बाबाची कृपा आसा. पण कायव म्हणा, बाजी आये बाबाक विसारलो नाय, दरवर्षी म्हाळ मात्र जोरात घालता!"

# मुलं घरी अभ्यासच करत नाहीत!

## या लाडक्या मुलांनो



प्रवीण कुबल,
शिडवणे, ता. कणकवली.



शीर्षक वाचून तुम्ही सुद्धा असंच म्हणाल अशी शक्यता अजिबात नाकारता येत नाही. कारण गेली कित्येक वर्षे मी हे ऐकत आलो आहे. अर्थात काही मुले याला अपवाद असतीलच. प्रत्येक गोष्टीला अपवाद हे असतातच. पण हा प्रश्न जसा पालकांना पडतो, त्यापेक्षा जास्त तो माझ्यासारख्या शिक्षकांना जास्त पडतो. आम्हांला जसा अभ्यास हवा असतो, तसा झपाटून अभ्यास करणारी मुलेच आता दुर्मिळ होत चालली आहेत.

दरदिवशी शिक्षक घरचा अभ्यास देत असतात. हा घरचा अभ्यास मुलांनी करावा असं अपेक्षिलेलं असतं. दिलेल्या अभ्यासापैकी सर्वच अभ्यास महत्वाचा असतो. पण मुले त्यापैकी आपल्याला जमणारा थोडासा अभ्यास करुन दुसऱ्या दिवशी ' विसरलो, लाईट नव्हता, पेन संपले, बरे नव्हते, आणि अशी अनेक कारणे सांगून प्रत्येक दिवस घालवायचे बघत असतात. त्यांना आजचा दिवस गेल्यासारखे वाटते, पण एक अभ्यासयुक्त दिवस त्यांच्या आयुष्यातून कायमस्वरूपी निघून गेलेला असतो. शिक्षकांना अभ्यासक्रम, उपक्रम आणि दैनंदिन कामे सतत येतच असतात. ती करता करता अभ्यास शिकवायचा असतो. शाळेच्या तासांपैकी सर्वच विषयांचे नेहमीच अध्यापन होणे शक्यही नसते. केवळ वाचन आणि घोकंपट्टी म्हणजे अभ्यास नसतो. केलेल्या अभ्यासाचा उपयोग मुलाने पुढील आयुष्याच्या उभारणीसाठी चिरकाल करावयाचा असतो असे अपेक्षिलेले असते.

आज मुले घरी गेल्यावर काय करत असतील? दप्तर जागेवर नीट ठेवतात का? दिलेला अभ्यास एका जागेवर बसून सुंदर अक्षरात लिहितात का? की मोबाईल घेऊन त्यावरच अभ्यास करत बसतात? गेम खेळत बसतात? यु ट्युब बघत बसतात?पालकांनी मोबाईल दिलाच नाही तर...तर मग त्यांचा मोर्चा टीव्ही कडे वळत असेल का? कार्टून्स आणि त्यांना आवडणारे किड्स चॅनल रिमोटवर भराभर बदलत असतील का ? नाहीतर घरात दप्तर फेकले की शाळेचे कपडे न बदलता शेजारी पाजारी खेळायला जाणारी मुलेही असतीलच. हे सगळं न करता प्रामाणिकपणे अभ्यास करणारी मुले पाहिली तर आजच्या पालकांनाच आश्चर्याचा सुखद धक्का बसू शकतो. घरी गेल्यावर जी मुले स्वतःहून अभ्यासाला बसतील ती मुले खरंच कौतुकास पात्र आहेत. पण आजच्या मुलांना सतत कानीकपाळी ओरडावे लागते. अभ्यास करा रे... अभ्यास करा रे...! असा नुसता पिच्छा पुरवावा लागतो. तेव्हा कुठे मुले कशीतरी मारुन मुटकुन अभ्यासाला बसली तर त्यांना आपण पालकांवर आणि शिक्षकांवर फार मोठे उपकार करत आहोत असे वाटत असेल. शिक्षक नेहमीच अभ्यास देत असतात. रोजचा अभ्यास त्या त्या दिवशी पूर्ण करण्याबाबत पुन्हापुन्हा सांगत असतात तर त्यांच्या पदरी नेहमीच अपेक्षाभंग येत राहतो. स्वतः कमी नसताना ज्यावेळी मुले कमी पडताना दिसतात, त्यावेळी जे दुःख होते ते नेहमी सलत राहणारे असते. सतत सांगून जर मुले पालकांचे ऐकत नसतील तर अशी मुले शिक्षकांचे का ऐकतील ? किंवा कशी ऐकतील असा मलाही प्रश्न पडतो. संध्याकाळी मुले अभ्यासाला बसण्यासाठी जी जागा निवडतात, तिथे भला मोठा टीव्ही त्यांचा अडसर बनलेला असतो. घरातील मोठी माणसे दिवसभर कामाने दमून विश्रांती घेत असतात. टीव्ही सिरीयल बघणे ही त्यांची दिवसभराची विश्रांतीच असते. त्यांना मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. असलाच तर टीव्हीवर एखादी मालिका त्यांना मुलांपासून दुरावत राहते. मग मुलेसुद्धा त्यात सामील होतात. पालकांबरोबर मुलांचेही मनोरंजन होत राहते. एक सिरीयल संपते, दुसरी सुरु होते. तिसरी, चौथी करत रात्रीचे नऊ, दहा, अकरा वाजतात. आता जेवत जेवत टीव्ही बघणे सुरु राहते. मुलांचा आजचा अभ्यास दुसऱ्या दिवसावर जात राहतो.

मुले सकाळी लवकर उठण्याची शक्यता नसतेच. उशिरा उठलेली मुले मग शाळेत जायची तयारी करु लागतात. अपूर्ण अभ्यास झालेली मुले पुन्हा एकदा शाळेत येतात. पुन्हा संध्याकाळी शाळा सुटते. पुन्हा तसेच चक्र सुरु राहते. खरा अभ्यास करायचा राहूनच जातो. शिक्षक आणि पालक यांचे प्रश्न अनुत्तरीतच राहतात. यावर काय करायचे ? ज्यांना प्रश्न पडला असेल त्यांनीच उत्तरे शोधायची असे सांगण्यात येते. गृहकार्य एक आव्हान?

## कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी- भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.

### ९. एखाद्या इमारतीमधील सदनिका/ गाळा/ दुकान/गोदाम इ. पैकी कोणत्याही मालकी हक्कांचा शोध

**आजकाल स्वतंत्र घर ही कल्पना हळूहळू लोप पावत चालली आहे. मध्यम व मोठ्या शहरात तर असे घर बघायला देखील मिळणे कठीण होत आहे. त्यामुळे सगळीकडे फ्लॅट संस्कृती पसरत चाललेली आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. सध्याच्या युगात एखादी सदनिका, गाळा, दुकान, गोडाऊन म्हणजे एखाद्या इमारतीमधील एक भाग असतो आणि त्याच्या माल**की हक्काचा शोध कसा घ्यायचा याची माहिती आपण घेऊया.

९) सदर बिल्डर/विकासक व जमीन मालक यांच्यामधील विकास करारनामा व आवश्यक ते कुलमुखत्यार पत्र बनलेले आहे की नाही हे पाहणे जरूरीचे आहे.

१०) सदर विकास करारनामा व कुलमुखत्यारपत्र नोंदलेले असले पाहिजे. तसेच त्यासाठी आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरलेले असणे गरजेचे आहे. तेव्हा ही बाब देखील लक्षात घेणे आवश्यक ठरते.

११) सदर सदनिका/गाळा हे मंजूर नकाशात (सँक्शन प्लॅन) दाखवलेले आहेत ना हे पाहणे खूप महत्त्वाचे आहे.

१२) ज्या मंजूर नकाशात (सँक्शन प्लॅन) ही सदनिका/गाळा दाखवलेले आहेत तो नकाशा योग्य त्या अधिकाऱ्याकडून मंजूर करून घेतलेला आहे ना? याची खातरजमा करून घेणे आवश्यक आहे.

१३) सदर नकाशात दाखवलेल्याप्रमाणेच इमारत बांधलेली आहे ना? याची खातरजमा करून घेण्यासाठी पुढील गोष्टी पहाणे आवश्यक आहेत.

अ) भोगवटा प्रमाणपत्र (आक्युमेशन सर्टिफिकेट) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने दिले आहे का ?

ब) दिले नसल्यास का दिले नाही याची चौकशी करावी.

क) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला सदर इमारतीसाठी दिला गेला आहे की नाही याची खात्री करावी.

ड) भोगवटा प्रमाणपत्र मिळाले असल्यास ते पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र आहे किंवा अंशतः आहे याकडे लक्ष द्यावे.

इ) जर अंशतः भोगवटा प्रमाणपत्र मिळाले असेल तर त्या प्रमाणपत्रात आपण शोध घेत असलेल्या सदनिका/गाळा यांचा समावेश आहे की नाही हे पाहवे.

१४) भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपेशन सर्टिफिकेट) हे एक महत्त्वाचे कागदपत्र आहे. त्यावर मालकी ही निर्धोक आहे की नाही याची खात्री करून घेता येते.

१५) यानंतर आपण सदर सदनिका /गाळा यांच्या मालकी हक्काचा शोध हा संबंधित निबंधक कार्यालयात घेणे आवश्यक आहे. (रजिस्ट्रार ऑफीस) त्यामध्ये सदर सदनिका / गाळा हे कुठे गहाण टाकलेले नाहीत ना? याची खात्री करून घ्यावी.

१६) सदर सदनिका/गाळा यांचेवर कोणत्या न्यायालयाचा आदेश नाही ना व तो नोंदलेला नाही ना ? (लिज पेंडसी इ.) याची खातरजमा करून घेणे आवश्यक आहे.

१७) समजा अशाप्रकारे जर सदर इमारतीमधील बांधकाम




जर गहाण टाकलेले असेल तर संबंधितानी सदर सदनिका/ गाळा विकत घेताना त्या संबंधित वित्तीय संस्थेने ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे ना याची खात्री करून घेणे जरूरीचे आहे.

१८) या शिवाय जर विकणाऱ्याने ती सदनिका/गाळा विकत घेताना जर कुठल्या वित्त संस्थेकडून / बँकेकडून/सहकारी पतपेढी/अन्य वित्तीय महामंडळे यांचेकडून कर्ज घेतले असेल तर पुढील गोष्टींची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

अ) सदर वित्तीय संस्थेने अशा महामंडळ पतपेढी यानी सदर सदनिका/गाळा विकण्याची हरकत घेतली आहे की नाही याची खातरजमा करून घेणे आवश्यक आहे.

ब) समजा हे कर्ज फिटले नसेल तर ते येणाऱ्या मोबदल्यातून वळते करून घेतले आहे किंवा नाही याची खातरजमा करून घेणे आवश्यक आहे.

क) कित्येकवेळा विकणाऱ्या व्यक्तीने / संस्थेने काढलेले कर्ज देखील हस्तांतरीत करण्याची पद्धत आहे. तसे केलेले आहे किंवा कसे याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

१९) विकत घेणाऱ्या व्यक्तीने जर सदर सदनिका / गाळा विकत घेणाऱ्याने जर काही कर्ज काढलेले असेल तर त्याला संबंधित बिल्डरने / विकासकाने ना हरकत प्रमाणपत्र म्हणजेच नो ऑबजेक्शन सर्टिफिकेट दिले आहे ना हे देखील पाहणे महत्त्वाचे असते.

२०) या शिवाय सदर इमारत ज्या जमिनीवर उभी आहे त्या जमिनीच्या अनुषंगाने देखील शोध घेणे जरूरीचे असते. या जमिनीच्या बाबतीत देखील पुढील गोष्टींची खात्री करून घेणे जरूरीचे आहे त्या अशा-

अ) सदर जमिनीच्या अनुषंगाने कोणते दावे कोणत्या न्यायालयात दाखल झालेले नाहीत ना?

ब) सदर न्यायलयानी सदर सदनिका/गाळा विक्रीवर बंधने येतील असे कोणतेही आदेश दिलेले नाहीत ना ?

क) सदर आदेशांचे भविष्यात काही विपरीत परिणाम होणार नाहीत ना याकडे देखील मालकी हक्काचा शोध घेणाऱ्याने लक्ष दिले पाहिजे.

२१) सर्वसाधारणपणे अशा जमिनीच्या वा जमीनदारांचे व त्या अनुषंगाने प्रलंबित असणाऱ्या दाव्यांचा प्रभाव संबंधित सदनिका/ गाळा यांच्या मालकी हक्कावर परिणाम होत नाही तरीसुद्धा त्या दृष्टीने मालकी हक्काचा शोध घेणाऱ्याने तिकडे लक्ष देणे जरूरीचे आहे. त्याने असे काही आढळल्यास त्याचा उल्लेख आपल्या शोध अहवालात (सर्च रिपोर्ट) मध्ये करावा व त्याचा परिणाम या सदनिका/ गाळा यांच्या मालकी हक्कावर होत नाही असे स्पष्ट नमूद करावे.

जेणेकरून शोध घेणाऱ्याने सर्व गोष्टी बारकाईने बघितले असल्याने देखील स्पष्ट होईल. हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण म्हणजे शोध घेणाऱ्याची जबाबदारी किती मोठी आहे हे लक्षात येईल. यानंतर आपण गृहनिर्माण संस्था नोंद झालेल्या इमारतीमधील एखादी सदनिका / गाळा घेताना कोणती काळजी घ्यावी याची माहिती पाहूया.

**क्रमशः**

## एक शापीत गंधर्व 'काशिनाथ घाणेकर'

## चित्रजगत



श्रीराम शेटये.
नालासोपारा

रंगमंचावरील अभुतपूर्व एन्ट्री म्हणजे डॉ. काशिनाथ घाणेकर यांची एन्ट्री. त्यांच्या एन्ट्रीलाच प्रेक्षकांमधून टाळ्यांच्या कडकडाट होत असे. 'रायगडला जेव्हा जाग येते' हे डॉ. काशिनाथ घाणेकर यांचे पहिले गाजलेले नाटक. वसंत कानेटकर लिखित या नाटकातील संभाजीची भुमिका डॉ.काशिनाथ घाणेकर करीत असत. 'रायगडला जेव्हा जाग येते' या मनोविष्लेषणात्मक पहिल्या ऐतिहासीक नाटकाने डॉ. घाणेकरांवर आणि या नाटकावर सारख्या उलट सुलट चर्चा झडत होत्या. संभाजीची भुमिका अतिशय लोकप्रिय झाल्याने काशिनाथ घाणेकर सतत प्रसिद्धिच्या झोतात होते.

परंतू डॉ. काशिनाथ घाणेकर या एका प्रतिथयश डॉक्टर ने रंगभूमीवर का यावे ? त्याकाळात रंगभूमीवर फारसे पैसेही मिळत नसत. अशा काळात मुंबईतील वरळी सारख्या उचभ्रू वस्तीत असणारा प्रशस्थ फ्लॅट आणि घरात चालू असलेला दवाखाना हे सर्व वैभव असताना नाटकात काम का करावे?

काशिनाथ घाणेकर यांचे वडील सरकारी डॉक्टर होते. त्यामुळे त्यांची गावोगावी बदली होई. अशावेळी काशिनाथ घाणेकर यांचा जन्म राजापूर मध्ये झाला होता. काशिनाथ घाणेकर यांची एक आत्या त्याच वेळेस काशिवरुन तिर्थयात्रा करून आली होती. म्हणूनच या नवजात बालकाचे नामकरण 'काशिनाथ' असे करण्यात आले होते. त्यांना आणखी सात भाऊ व एक बहिन होती. डॉ. काशिनाथ सगळ्यात धाकटे शेंडेफळ. या आठही मुलांना डॉक्टरांच्या वडीलांनी यथाशक्ती शिक्षण देऊन आत्मनिर्भर बनविले होते. गजाननराव, परशुराम आणि काशिनाथ हे तिघे डॉक्टर झाले. नरहरपंत इन्कमटॅक्स ऑफिसर झाले, भार्गवराम मेडिकल रिप्रेझेंटेटीव् झाले.शामराव एअर इंडिया मध्ये सेवेत रुजू झाले. सर्वात मोठे बंधू कोल्हापूरात स्थाईक झाले. एकुलत्या एका मुलीचा माधवराव काळे या सुशिक्षित तरूणाशी विवाह करून दिला.



डॉ. घाणेकर यांचे वडील निव्वळ शिक्षण पुर्ण होईपर्यंतच मुलांना अर्थसहाय्य करीत असत. पदवी मिळाल्यावर मुलांना कोणताही कुबडी ते देत नसत. ज्याने त्याने स्वतःचा मार्ग निवडावा अशी त्यांची धारणा होती. आपल्या वडीलांनी आपल्या कुटूंबासाठी घेतलेले कष्ट आठवले की काशिनाथ घाणेकर यांना गहिवरुन येई. त्यांचे वडील पहाटे बॅग भरून निघत ते रात्रीच परत येत असत. त्यावेळी दळणवळणाची साधने तरी कुठे होती? कुठे सायकल चालवत तर कुठे पायी चालत काशिनाथ घाणेकर यांचे वडील पेशंट तपासायला गावोगावी जात असत. साधारण १९४६ मध्ये ते चिपळूणात स्थाईक झाले. तसे त्यांचे मुळ गाव साखरपा. काशिनाथ घाणेकर यांच्या वडीलांची काही मते घाणेकरी विशेषता दाखविणारी होती. त्यांनी आपल्या दारावर आपल्या नावाची पाटी कधीही लावली नाही. डॉक्टर घाणेकर कुठे रहातात? हे माणसे शोधत आली पाहिजेत अशी त्यांची धारणा होती. रामायण ,महाभारत पेक्षा मुलांनी 'केसरी' हे लोकमान्यांचे वर्तमानपत्र वाचावे असे त्यांना वाटे.

काशिनाथ घाणेकर यांना शिक्षणाबरोबरच नाटकाची वेड होते. परंतू त्यांच्या वडीलांना हे मंजूर नव्हते. डॉज गाडीतून फिरणाऱ्या दामुअण्णा मालवणकर यांच्या दिमाखाचा काशिनाथ घाणेकर यांना हेवा वाटायचा. नटवर्य नानासाहेब फाटक यांनी काशिनाथ घाणेकर यांच्यावर आपल्या अभिनयाने गारुड केल होत. त्राटीके मध्ये नानासाहेबांनी केलेल्या भुमिकेने ते काशिनाथ घाणेकर यांचे आदर्श हिरो बनले होते. नानासाहेब बोलतात कसे? चालतात कसे? याकडे काशिनाथ घाणेकर यांचे लक्ष लागून राहिलेले असे. काशिनाथ घाणेकर यांनाही आपण नाटकात काम करावे असे वाटत लागले होते. नाटकाच्या वेडापायी अभ्यासात स्वारस्य उरले नव्हते. एफ. वाय. ला एटी. केटी.लागली. इंटर सायन्सला दाखल झाले परंतू परीक्षेला कोराच पेपर टाकून आले त्यामुळे आईवडील खुप नाराज झाले.

**क्रमशः**

ललित

# नवरात्रौत्सव- एका आदिशक्तीचा..!

प्रा.के.एस.शिरबंदे
दापोली.

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते॥**

शारदीय नवरात्र हा देवी दुर्गा मातेच्या सन्मानार्थ साजरा केला जाणारा एक हिंदू सण असून, तो पावसाळ्यानंतर येणाऱ्या शरद ऋतूमध्ये म्हणजेच, आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून ते शुद्ध नवमीपर्यंत, नऊ रात्री (नऊ दिवस) साजरा होतो. तिला शारदीय नवरात्र म्हटले जाते. तसेच वसंत ऋतूमध्ये येणाऱ्या चैत्र महिन्यातील शुद्ध प्रतिपदेपासून ते शुद्ध नवमीपर्यंत साजरा केल्या जाणाऱ्या दुर्गोत्सवला 'वासंतिक नवरात्र' असे म्हणतात. तथापि शारदीय नवरात्र हा सण सर्वत्र मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

नवरात्रौत्सव आणि व्रत- हा सण नऊ दिवस आदिशक्तीची, आदिमायेची म्हणजेच देवी दुर्गा मातेची आराधना करण्याचा आहे. पावसाळा बहुतेक संपलेला असतो. शेतातील पिके तयार होत आले असतात. काही तयार झालेले असतात. अशा नैसर्गिक वातावरणात नवरात्रीच्या पहिल्या दिवशी प्रतिपदेला घटस्थापना होते. देव्हाऱ्याच्या बाजूलाच मातीच्या ढिगावर नऊ प्रकारच्या बिया अंकुरण्यासाठी टाकतात. त्या ढिगावर पाण्याने भरलेला कलश ठेवून त्यावर विड्याची पाने व नारळ ठेवले जाते. वरती कलशावर नऊ दिवस दररोज एक याप्रमाणे वेगवेगळ्या फुलांच्या माळा सोडल्या जातात. बाजूलाच नऊ दिवस अखंड नंदादीप तेवत ठेवला जातो. दररोज त्या कलशाची म्हणजेच देवीची आरती, पूजा अर्चा केली जाते. अशा तऱ्हेने प्रतिपदेचा दिवस हा घटस्थापनेचा असतो. घटस्थापना केल्यानंतर नवरात्रीतल्या नऊ दिवशी देव्हाऱ्यातला देवाना अजिबात हलवले जात नाही.

**देवीची नऊ रूपे-** सर्व देवांच्या ठिकाणी असलेल्या शक्तींचे दैवीकरण होऊन त्या शक्ती रूप मूर्तीला देवी असे नाव मिळाले. शारदीय नवरात्रौत्सव मध्ये नऊ दिवस वेगवेगळ्या नऊ देवींच्या रूपांची पूजा अर्चना करण्यात येते. पहिला दिवस- शैलपुत्री देवी. दुसरा दिवस- ब्रह्मचारिणी देवी. तिसरा दिवस- चंद्रघटा देवी. चौथा दिवस- उष्मांडादेवी. पाचवा दिवस- स्कंद माता देवी. सहावा दिवस- कात्यायनी देवी. सातवा दिवस- कालरात्री देवी. आठवा दिवस - महागौरी देवी व नवव्या दिवशी - सिद्धीदात्री देवीची पूजा करण्यात येते.

**नवरात्रौत्सवातील पूजा विधी-** शारदीय नवरात्रोत्सव सहसा ऑक्टोबर महिन्यात येतो. आपल्या कुळाचाराप्रमाणे घरात घटस्थापना करण्यात येते. ऊर्जा आणि शक्तीची देवता म्हणून दुर्गेची पूजा या दिवसात करण्यात येते. फळ, फुल आरती आणि भजन स्वरूपात ही पूजा करण्यात येते. नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा करण्यात येते, तसेच देवीला वेगळ्या नऊ रंगाचे वस्त्र नऊ दिवस परिधान करण्यात येते. या नवरात्री मध्ये कुमारिका पूजन, पार्वती पूजन, सरस्वती पूजन आणि कालीकापूजन करण्यात येते. कुमारिकांमध्ये दुर्गाचे रूप असते असे मानण्यात येते. नऊ कुमारिकांचे पाय धुवून आणि त्यांच्या आवडीचे जेवण करून पूजन करण्यात येते तसेच त्यांना भेटवस्तूही दिल्या जातात. अनेक ठिकाणी अष्टमीच्या दिवशी होम हवन करण्यात येते. सर्व गोष्टी पवित्र करण्यासाठी पूजा करण्यात येते. तर नऊ दिवस भोंडला खेळून देवीचा जागरही केला जातो. दरम्यान काही ठिकाणी आरती झाल्यानंतर घागर फुंकणे हा विशेष कार्यक्रमही असतो. अष्टमीला हा कार्यक्रम योजला जातो.ही घागर उदाच्या धुराने भरली जाते आणि पाच वेळा फुंकली जाते. त्यामुळे श्वसन मार्ग शुद्ध होतो असे समजण्यात येते.

नवरात्र उत्सवात देवीची ओटी भरणे हा देखील एक महत्त्वाचा भाग असतो. ही देवीची ओटी भरणे म्हणजे आज-काल अनेक जणींना माहीत नसते. ते काय असते जाणून घेणे महत्त्वाचे आहे. देवीला या नऊ दिवसांमध्ये सुती अथवा रेशमी साडी अर्पण करायची असते. या धाग्यामध्ये देवी कडून येणाऱ्या सात्विक लहरी ग्रहण करण्याची क्षमता इतर धाग्यापेक्षा अधिक असते म्हणून ही प्रथा आहे. त्या वेळच्या दिवसात साडी नेसण्याला प्राधान्य देण्यात येते. दोन्ही हाताच्या ओंजळीमध्ये ही साडी, त्यावर खण आणि नारळ ठेवून, हाताची ओंजळ छातीच्या दिशेने असेल अशी ओटी भरावी. नारळाची शेंडी देवीच्या दिशेने राहील याची काळजी घ्यावी. देवीकडून आपल्याला अधिकाधिक उत्साह मिळावा, आपली उन्नती व्हावी यासाठीच या काळात देवीची ओटी भरून तिची प्रार्थना करण्यात येते. तांदूळ हे सर्व समावेश असतात. चैतन्य आणि चांगल्या लहरी शरीरापर्यंत पोहोचवण्याचे काम हे तांदूळ करतात. म्हणूनच ओटीमध्ये तांदुळाचाही समावेश करण्यात येतो.

**जोगवा-** जोगवा मागणे हा एक प्रकारचा देवीची उपासना करण्याचा एक प्रकार आहे. देवाचा कुलधर्म म्हणूनही जोगवा मागितला जातो. मंगळवारी, शुक्रवारी, पौर्णिमेला किंवा नवरात्रात जोगवा मागितला जातो. परळी मध्ये देवी ठेवून किमान पाच घरी जाऊन मुठभर तांदूळ किंवा पीठ मागणे त्याला जोगवा मागणी असे म्हणतात. हे उपासक गळ्यात कवड्यांची माळ घालून जोगवा मागतात. अहंकाराचे विसर्जन व्हावे हा या जोगवा मागण्याचा हेतू असावा असे वाटते.

**देवीचा गोंधळ-** शारदीय नवरात्र काळात नऊ दिवस देवीचा गोंधळ घालण्याची पद्धत विविध समाजात प्रचलित आहे. देवीचा उपासक ज्याला गोंधळी असे म्हणतात, ते गोंधळी संबळ या वाद्याचा साथीने देवीची स्तुती असणारी कवणे देवीसमोर सादर करतात. या कला प्रकाराला गोंधळ घालणे असे म्हटले जाते. भगवान परशुरामानी संबळ सारखे वाद्य तयार करून ती आपली माता रेणुका समोर वाजवून तिला वंदन केले. तेव्हापासून गोंधळ परंपरा सुरू झाली असे म्हटले जाते.

मार्कंडेय पुराणातील देवी महात्म्यात सांगितले आहे की, शरद ऋतुतील वार्षिक महापूजात देवी महात्म्य भक्तीपूर्वक ऐकल्यास सर्व बंधनापासून व्यक्ती मुक्त होते आणि धन धान्यतेने परिपूर्ण होते. एकूण साडेतीन शुभ मुहूर्तापैकी दसरा हा एक चांगला शुभ मुहूर्त आहे.

---

# प्रेम


ललित



सुभाष भाऊ चोपडे,
पाचल, ता. राजापूर.

प्रेम अडीच अक्षरी शब्द.पण अख्ख्या जगाला व्यापून टाकण्याची क्षमता यात आहे. अमंगल, अपवित्र, दुष्ट अशा सर्वांना पळवून लावणारा शब्द म्हंटले तर वावगे ठरणार नाही .प्रत्येकाची याकडे बघण्याची पद्धत वेगवेगळी. या प्रेमाची अनेक अदभुत रूपे आहेत. हे प्रेम व्यक्त करण्याच्या पद्धतीही वेगवेगळ्या. आईच आपल्या मुलांवर असणार प्रेम, कुटुंबातील प्रत्येकाचं एकमेकांवर असणार प्रेम, कलाकाराचं आपल्या कलेवर असणार प्रेम, गुरुचे आपल्या शिष्यावर असणारे प्रेम, शेतकऱ्याचे काळ्या आईवर असणारे प्रेम, जवानांचे आपल्या मातृभूमीवर असणारे प्रेम या प्रत्येकाचं प्रेम अवर्नीय आणि अनाकलनीय असत. द्वेष, मत्सर यांना प्रेमाने ।जिंकता येते. प्रेमाने सर्व जग जिंकता येते असे म्हणतात ते खरचं आहे. एखादा प्रियकर आणि प्रेयसी यांच्यातच प्रेम असत अस नाही. पण यांनी देखील पवित्र नि खरंखुरं प्रेम कस असत हे अख्ख्या जगाला दाखवून दिलं आहे. त्यामध्ये श्रीकृष्ण-राधा, हिर-रांझा, लैला-मजनू, रोमिओ-जुलीएट अशी कितीतरी नावे घेता येतील. पण सध्या प्रेमाकडे बघण्याची विकृती पुढे येत आहे. एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हत्या पाहून प्रेमालाही लाजवेल अशी कृती मानव नावाचा दानव करत आहे. खरतरं प्रेम हे देवाघरचे देणे आहे , ते ईश्वराने प्रत्येकाला बहाल केले आहे पण त्याचा वापर सगळेच करतात असे नाही. प्रेम हे योगात ,भोगात, त्यापेक्षाही अधिक त्यागात असते हे विसरलेलीच लोकं आज अधिक पहायला मिळतात.

हे जग खूप सुंदर आहे आणि एकमेकाशी आपण प्रेमाने राहिलो, वागलो तर ते अधिक सुंदर असल्याचे जाणवेल. या प्रेमाला वय, जात, धर्म, रंग या कशातच बांधून ठेवता येत नाही की त्याला कोणतीही अट लागू पडत नाही. प्रेम करणं आणि प्रेम मिळवणं यात खूप फरक आहे. आपण ज्यावर प्रेम करतो त्यांच्याकडूनही आपल्याला प्रेम मिळालेच पाहिजे असं मानणे चुकीचे आहे पण आपलं प्रेम पाहून त्यानंही आपल्या प्रेमात पडल पाहिजे असं वागणं आपलंही असायला हवं. शिवरायांनी आपल्या रयतेला दिलेलं प्रेम पाहूनच रयत शिवबासाठी जगायचे आणि शिवबासाठी मरायचे असे मानून स्वराज्याची देखणी निर्मिती करू शकली, कुष्ठ रोग्यांच्या सेवेतून प्रेम व्यक्त करणारे बाबा आमटे, मदर तेरेसा या प्रेमरूपी, वात्सल्यमुर्तीच आहेत. डॉक्टरांनी रुग्णांशी बोलताना वापरलेले दोन शब्द, आईच्या कुशीत शिरून बाळाने बोबड्या बोलातून तिच्याशी केलेलं हितगुज, अपघातात जखमी झालेल्याला जनतेने दिलेले धिराचे दोन शब्द प्रेमाचे असतील तर त्याच आयुष्य नक्कीच वाढल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येकानं प्रेमाने राहायचे ठरवले तर हे जग किती सुंदर भासेल.



चला तर मग स्वतःपासून सुरवात करूया.आपणच प्रत्येकाशी प्रेमाने वागूया आणि सर्वांना आपलंसं करून घेऊया.

शेवटी मला फक्त एवढंच म्हणायचं आहे की,आपल्या प्रेमातून कशाची अपेक्षा, कसलाही स्वार्थ,कोणताही मोबदला मिळावा अस असता कामा नये.प्रेमाची ज्योत आपण लावूया आणि त्या ज्योतीने असंख्य ज्योती पेटवण्याचे स्वप्न याची देही,याची डोळा पाहूया. हातात हात गुंफून, हृदयास हृदय जोडून प्रेमाने व्यापलेले जग निर्माण करण्याचा प्रेमळ प्रयत्न करूया. हे करत असताना प्रत्येकाच्या प्रेमाचा आदरही करूया.

# नवदुर्गोत्सव

## अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

देवीची सतत कृपा राहावी म्हणून आश्विन महिन्यात नवरात्र करण्याची प्रथा सर्वत्र रूढ आहे. महिषासुर दैत्याला ठार मारण्याकरता झालेल्या नऊ अहोरात्रीच्या युद्धातील देवीच्या विजयाचा आनंदोत्सव साजरा करताना देविप्रति कृतज्ञता अभिव्यक्त करण्याच्या निमित्ताने नवरात्र उत्सव साजरा केला जातो. विविध धर्मीय माणसांमध्ये कुळाचार ठराविक पद्धतीने चालत आलेले असतात. कुळाचाराची एक पद्धती, रीत पडलेली असते. नवदुर्गा पूजन हा एक असाच महत्वपूर्ण कुळाचार आहे.

१) आप, २) तेज, ३) वायू, ४) पृथ्वी आणि ५) आकाश ही पाच तत्वे (पंचतत्वे) सर्वत्र व्यापून आहेत. या पंचतत्त्वांच्या अनुक्रमे १) शंकर, २) सूर्य, ३) विष्णू, ४) दुर्गा आणि ५) गणपती या पाच देवता (पंचायतन) आहेत.

या तत्त्वांमध्ये शत्रुत्व / मित्रत्व आहे. पृथ्वीतत्व हे इतर चार तत्वांना साधक असे तत्त्व आहे शिवाय ही उर्वरित चार तत्वे पृथ्वीला साधक आहेत. यामुळे इतर तत्त्वांच्या शत्रुत्वात तसेच मित्रत्वात पृथ्वी तत्व साधक समन्वय साधणारे असे तत्त्व आहे. हे तत्व सर्वांचा सुमेळ साधते. आपण पृथ्वीचा गुणधर्म विचारात घेतला तर पृथ्वी हे बाहेरील सर्व ताप शांतपणे सहनशीलतेने सहन करीत असते परंतु या तापाचा अतिरेक झाला तर पोटातील ज्वालाग्नी बाहेर ओकते आणि भौतिकता तापते, संतापते. पृथ्वी तत्वाच्या दुर्गा या देवतेचेही असेच स्वरूप सांगितले जाते. सत्वगुणी, मायाळू स्वरूपातून रजोगुणी स्वरूपामधून तमोगुणी स्वरूपापर्यंत व या उलट क्रमाने दुर्गेच्या आत्मस्वरूपाची नांदी असते. पुण्यवंतांचे भवताप हरण करणारी आणि पाप्यांना संतापाने जाळून खाक करणारी अशी दुर्गेची ख्याती आहे. या दुर्गेची तमोगुणी महाकाली, रजोगुणी महालक्ष्मी व सत्वगुणी महासरस्वती अशी तीन रूपे आहेत. या तीन रूपांची प्रत्येकी तीन रूपे म्हणजे नवदुर्गा मानले जाते. कुळाप्रमाणे दुर्गेचे अंश असणाऱ्या विविध नावांच्या देवींची 'कुलदेवता' म्हणून पूजाअर्चा केली जाते. पूर्वज पूर्वापार ज्या एका देवीची सातत्याने पिढ्यान्पिढ्या पूजा करीत आलेले असतात ती देवी पुढे त्या घराण्याची 'कुलदेवता' ठरून जाते. पूर्वजांच्या देवीपूजेत खंड पडत आल्याने व पुढील पिढीत कुलदेवता पुजनाचे संस्कार न घडल्याने कित्येकांना कुलदेवतेचे नाव व कुलदेवता पूजन या बाबी पारख्या झालेल्या दिसून येतात.

सर्वत्र, विशेषतः कोकणात बारा-पाचाची राहटी प्रचलीत आहे. कुलदेवतेच्या सकारात्मकते शिवाय व्यक्तीच्या जीवनातील बारा-पाचाचा (बारा राशी व पाच तत्त्वे यांचा) मेळ नक्षत्र देवता अर्थात व्यक्तीची आराध्य देवता साधू शकत नसते. त्यामुळे कोणत्याही उपासनेत आकाश तत्वाचा गणपती आणि पृथ्वी तत्वाची कुलदेवता यांना अत्यंत प्राधान्याने महत्त्व आहे. नवदुर्गोत्सव हा कुलदेवतेशी जवळीक साधणारा असा नवदुर्गा पूजनाचा एक महत्त्वपूर्ण कुळाचार आहे.

नवरात्रातील देवी पूजा हा कुळाचार साध्य करताना थोडक्यात पुढील प्रमाणे कृती व आचार करता येईल. (यामध्ये बहुतांशी मंत्र हा विषय थोडक्यात पूजा करण्यासाठी टाळलेला आहे-ज्यांना सविस्तर पूजा करावयाची असेल त्यांनी षोडशोपचार पूजेचे मंत्र म्हणून पूजा करावी.)




१) घरात सोईच्या ठिकाणी पूर्वेकडे एका पाटावर किंवा चौरंगावर बांबू पासून बनवलेल्या टोपलीत किंवा तांब्याच्या मोठ्या ताटात किंवा पानांपासून बनवलेल्या पत्रावळीत माती भरून गोलाकार पसरावी.
२) त्या मातीत मध्यभागी मातीच्या घटाची किंवा तांब्याच्या कलशाची [ त्यामध्ये सप्तमृतिका किंवा माती , पंचधातूचा तुकडा किंवा पैशाचे नाणे, पाच प्रकारची रत्ने (पंचरत्ने), अखंड सुपारी, औषधी वनस्पती किंवा सर्व-औषधी, पाच प्रकारची पाने (पर्यायाने आंब्याची पाच पाने), ७,९ किंवा १८ प्रकारची धान्ये व पाणी घालून ] स्थापना करावी.
३) त्या घटावर एका ताटात/ताम्हणात धान्ये किंवा तांदूळ पसरून रास करावी.
त्या राशीवर अखंड सुपाऱ्यांवर मध्यभागी दुर्गा, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती व महागणपती यांची स्थापना करावी.
४) त्यांच्या सभोवती वर्तुळाकार ईशान्य (उत्तर-पूर्व) दिशेपासून प्रदक्षिणीय अनुक्रमे १) शैलपुत्री,२) ब्रह्मचारिणी,३) चंद्रघंटा,४) कुशमांडा, ५) स्कंदमात्रा,६) कात्यायनी,७) कालरात्री,८) महागौरी आणि ९) सिद्धीदात्री या नवदुर्गांची अखंड सुपाऱ्यांवर स्थापना करावी.
५) घटाची स्थापना करून झाल्यानंतर घटाभोवतीच्या मातीत वर्तुळाकार नऊ प्रकारची धान्यबिजे पेरावीत.
६) या मांडणीच्या उत्तर दिशेला तुपाची समई व दक्षिण दिशेला तेलाची समई प्रज्वलित करावी. चौरंगाच्या वरच्या दिशेला ' मंडप देवता ' म्हणून आंब्याची डहाळी टांगावी.

वरील प्रमाणे सर्व मांडणी झाल्यानंतर मंडप देवता (आंब्याची डहाळी), वेदिका (चौरंगावरील टोपलीतील मातीचा ढीग ज्यावर कलशाची मांडणी केलेली आहे), घट (वरूण), त्यावर मांडलेल्या सुपाऱ्यांवरील सर्व देवता दुर्गा, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती, महागणपती व नवदुर्गा) यांची, घंटा, पूजेसाठी घेतलेला पाण्याचा तांब्या, समया (दीप) इत्यादींची रीतसर शोडषोपचारे (किंवा पंचोपचारे) पुढील प्रमाणे पूजा करावी.

सर्वत्र पंचगव्य शिंपडून शुद्धीकरण करावे. दोनदा आचमन करावे.
केशवाय नमः। माधवाय नमः। गोविंदाय नमः । विष्णवे नमः । मधुसूदनाय नमः । त्रिविक्रमाय नमः । वामनाय नमः । हृषिकेशाय नमः । पद्मनाभाय नमः। दामोदराय नमः । संकर्षणाय नमः। वासुदेवाय नमः। प्रद्युमनाय नमः । अनिरुद्धाय नमः । पुरुषोत्तमाय नमः । अधोक्षजाय नमः । नारसिंहाय नमः । अच्युताय नमः । जनार्दनाय नमः ।

(पान ९ वर)

## तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

### सदरक्षणाय... खलनिग्रहणाय! (भाग - 2)

**(शुभांगीची ड्युटी बंदोबस्त म्हणून लालबागच्या राजा इथे लागली होती..)**

शुभांगीला आपल्या गावाकडचा नवसाला पावणारा गणपती आठवला.पण इतकी अलोट गर्दी नसे. कुठूनतरी मधुकर राणे नी दोन वडापाव आणि पाण्याची बॉटल तिला देत म्हटलं "ताई उभ्या उभ्या खाऊन घ्या...आपल्याला अजून खूप गर्दीचा सामना करायचा आहे."

खरं म्हणजे शुभांगीला केव्हा पासून बाथरूमला जायचं होतं. लेडी हवालदार कुठं दिसतेय का बघत होती. पण पार टोकाला दिसली. मधुकर ला कसं सांगणार? बिचाऱ्याने वडापाव तरी आणून दिला. ह्या एरियातलं "सुलभ"तरी कुठे माहिती आपल्याला? काय करावं...जसं जसं बाथरूम चा विचार केला तसं अजूनच अस्वस्थ वाटत होतं ...तेवढ्यात तिला दोन होमगार्ड च्या मुली तिच्या दिशेने येताना दिसल्या.

लगबगीने तिने त्यांना हातातले वडापाव दिले आणि विचारलं बाथरूम कुठेय. त्यांनाच विनंती केली की पंधरा मिनिटं इथे थांबाल का? मी पटकन येते. त्या खुशीने वडापाव घेऊन हो म्हणाल्या. मधुकर भाऊ गर्दीत कुठे पुढे गेला होता. त्याला न सांगता पटकन शुभांगी सुलभ च्या दिशेने गेली.

...आणि व्हायचा तोच गोंधळ झाला. त्या पंधरावीस मिनिटात. कोण्या मंत्र्याचा उजवा की डावा हात लवाजमा घेऊन आला आणि शिस्तीत चाललेल्या दर्शनाच्या रांगेत खूप धक्काबुक्की, महिलांची चेंगरा चेंगरी, मुलांची रडरड, हा गोंधळ उडाला...होमगार्ड मुलींनी लाठी आडवी धरत गर्दीला आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला त्यात एका बाईला लाठी लागली.. मग काय...त्या धक्काबुक्कीचं रूपांतर मारामारीत झालं...आरडा ओरडा ऐकूनच बाकीचे पोलीस तिकडे पोहचले.तेवढ्या गडबडीत शुभांगी आणि साळुंके साहेब एकदमच तिथे आले...त्यांनी जमावाला आटोक्यात आणलं. पण शुभांगीकडे अशा जळजळीत नजरेने पाहिले की शुभांगी समजून चुकली आता आपली खैर नाही.



तिला आपले बाबा नेहमी एक उदाहरण द्यायचे त्याची आठवण झाली "आपण चुकून तिकीट न काढता गेलो तर हमखास टी.सी.पकडतो...त्यात त्याची चूक नाही. आपण तसं वागू नये..."पण आत्ता आपली काय चूक होती? पाच सहा तास एकाजागे वर उभं आहोत...आणि नेचर कॉल कुणाला चुकलाय? बरं आपण पर्यायी व्यवस्था करून गेलो होतो....! आपण उद्या साहेबांनी विचारलं की हे सगळं सांगायचं.

पोलिसांनी साखळी करून सगळ्यांना बाप्पाच्या दर्शनाला अगदी पायापाशी नेलं त्यामुळे सगळा कल्ला शांत झाला. शुभांगी पण त्या साखळी मुळे अगदी बाप्पाच्या पायापाशी आली. परंतु तिच्या मनात आपण न केलेल्या अपराधाची बोच मनभरून पसरली होती की तिला बाप्पाच्या पायाशी काय मागावे हे सुचलं नाही. हात जोडून फक्त एवढंच म्हणाली "बाप्पा तू सगळं जाणतोस...तुझ्या पायाशी काय मागणार?"

अनंतचतुर्दशी...माणसांचा महापूर. एवढी गर्दी पाहूनच तिला कळलं आज काही खरं नाही. रात्री दोनची शेवटची लोकल पकडून कशीबशी नाला सोपाऱ्याला आली. स्टेशनात राहूलला बघून तिला खूप बरं वाटलं. मनात म्हणाली राजा पावला म्हणायचा निदान ह्याला तरी माझी काळजी.स्टेशन जवळच्या चायनीज मध्ये तिला घेऊन गेला.

दोन दिवस सुट्टी घेतली होती.कामावर गेली. सगळ्या पोलीस स्टेशन मध्ये गणपतीत झालेल्या एकेक गमती जमतीच्या गोष्टी...कोणी देवाच्या पायाशी काय मागितलं वगैरे चाललं होतं. तिची मैत्रीण म्हणाली "शुभे.. तू एकदम लकी निघालीस ग. न मागता राजाच्या

(पान ९ वर)

# सरकारी योजना/नोकरी

## सलोखा योजना

**राज्यातील शेतकऱ्याचे आपापसात असणारे जमिनीचे वाद मिटविण्यासाठी सुरु करण्यात आलेली महत्वाची अशी एक योजना आहे.**

महाराष्ट्रामध्ये किंबहुना देशामध्ये जमिनीच्या वादाबाबतची कोट्यवधी प्रकरणे विविध न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. त्यामध्ये मुख्यतः मालकी हक्काबाबतचे वाद, शेत बांधावरुन होणारे वाद, जमिनीच्या ताब्याबाबतचे वाद, रस्त्याचे वाद, शेत जमीन मोजणीवरुन होणारे वाद, अधिकार अभिलेखातील चुकीच्या नोंदीमुळे होणारे वाद, शेतीवरील अतिक्रमणावरुन होणारे वाद, शेती वहीवाटीचे वाद, भावा- भावांतील वाटणीचे वाद, शासकिय योजेनेतील त्रुटी किंवा प्रस्ताव अमान्यतेबाबतचे वाद इत्यादी कारणांमुळे शेतजमीनीचे वाद समाजामध्ये आहेत.

शेतजमिनीचे वाद हे अत्यंत क्लिष्ट स्वरूपाचे व गुंतागुंतीचे असल्याने न्यायालयातील व प्रशासनातील पुरेशा यंत्रणेअभावी सदर वाद वर्षानुवर्षे चालू आहेत. शेतजमिन हा प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा व संवेदनशिल विषय असल्यामुळे त्यातील वादांमुळे कौटुंबिक नात्यांमध्ये एकमेकांबद्दल असंतोषाची भावना व दुरावा निर्माण झाला आहे. सदर वादांमुळे अनेक पिढ्यांचे नुकसान झाले असून, आजच्या पिढीचाही खर्च व वेळेचा अपव्यय होत असून अशा प्रकारचे वाद संपुष्ठात येण्यामध्ये म्हणावी अशी प्रगती झालेली दिसत नाही.

सदर वाद संपुष्ठात येवून समाजामध्ये सलोखा निर्माण व्हावा व एकमेकांतील सौख्य, शांतता व सौहार्द वाढीस लागावे यासाठी शासनाने अशा एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमिन धारकांचे अदलाबदल दस्तांसाठी नोंदणी फी व मुद्रांक शुल्कामध्ये सवलत देण्याची सलोखा योजना राबविण्याची आली.

**शेतजमिनीचा ताबा व वहिवाटीबाबत शेतकऱ्यांतील आपआपसांतील वाद मिटविण्यासाठी व समाजामध्ये सलोखा निर्माण होऊन एकमेकांमधील सौख्य व सौहार्द वाढीस लागण्यासाठी एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमिन धारकांचे अदलाबदल दस्तांसाठी मुद्रांक शुल्क नाममात्र 1000/- रुपये व नोंदणी फी नाममात्र 1000/- रुपये आकारण्याबाबत सवलत देण्याची सलोखा योजना राबविण्यास आली आहे.**

**योजनेचे नाव : सलोखा योजना**
**विभाग : महसूल व वन विभाग**
**उद्देश : शेतकऱ्याचे जमिनीचे वाद मिटवणे**
**लाभ : शेतकऱ्याचे जमिनीचे असलेले वाद मिटतील**
**अर्ज करण्याची पद्धत : ऑफलाईन**

**सलोखा योजनेच्या लाभासाठी तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यामार्फत प्रमाणपत्र देण्याबाबत करण्यात येणारी कार्यपध्दती**

- तलाठी व मंडळ अधिकारी हे गावातील पंचासह चौकशी करुन किंवा चतुर्सिमाधारकांशी चर्चा करुन किंवा तलाठी चावडीमध्ये चर्चा करुन किंवा अदलाबदल करु इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांचे किंवा चतुर्सिमा धारकांच्या घरी चर्चा करुन सदर ठिकाणी पहिल्याची मालकी असलेली जमीन किमान १२ वर्षापासून दुसऱ्याचे ताब्यात आहे किंवा कसे ? व दुसऱ्याची मालकी असलेली जमीन किमान १२ वर्षापासून पहिल्याचे ताब्यात आहे किंवा कसे ? याबाबतची नोंद विहित नमुन्यातील पंचनामा नोंदवहीमध्ये करतील. त्याआधारे तलाठी पक्षकारांना जावक क्रमांकासह पंचनामा प्रमाणपत्र देतील.
- एकूण चतुर्सिमा धारकांपैकी अधिकार अभिलेखात नावे असणाऱ्या कमीत कमी दोन (वेगवेगळ्या गटातील) सज्ञान व्यक्तींच्या सह्या पंचनामा नोंदवहीमध्ये घेतील. एखाद्या गटाला चतुर्सिमा धारक एकच गट असेल तर त्या चतुर्सिमाधारकाची सही पंचनाम्यावर घेतील.
- काही वेळा फार मोठा गट असून त्याचे वाटप व अनेक पोटहिस्से झालेले असतात. परंतु फाळणीबारा / पोटहिस्सा झालेला नसतो. अशा वेळी प्रत्यक्ष स्थळपाहणी करुनच पंचनामा करतील त्यावेळी शेजारचे वहिवाटदार असलेले दोन सज्ञान खातेदारांची पंचनामा नोंदवहीवर सही घेतील.
- तलाठी गावस्तरावर सलोखा योजनेसाठी पंचनाम्याचे एक रजिस्टर (नोंदवही) ठेवतील व त्या नोंदवहीवरुन तलाठी पक्षकारांना पंचनाम्याची प्रमाणित प्रत देतील
-

**सलोखा योजनेचे उद्दिष्ट:**

- शेतकऱ्यांमधील जमिनीच्या वादांचे त्वरित आणि न्याय्य निराकरण करणे.
- शेतकऱ्यांना न्यायालयात जाण्याची गरज कमी करणे.
- ग्रामीण भागात शांतता आणि सलोखा राखणे.

**योजनेअंतर्गत आवश्यक पात्रता:**

- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा मूळ रहिवाशी असणे आवश्यक आहे.
- अर्जदार शेतकरी असणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:**

- सलोखा योजनेचा कालावधी अदलाबदल दस्तासाठी नोंदणी फी व मुद्रांक शुल्कामध्ये सवलत देण्याबाबतची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांचा राहील.
- सदर योजनेत पहिल्या शेतकऱ्याच्या शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे किमान 12 वर्षापासून असला पाहिजे.
- एकाच गावात जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांचे परस्परांकडे मालकी व ताबा असलेबाबतचा वस्तुस्थितीदर्शक पंचनामा मंडळ अधिकारी व तलाठी यांनी विहित पंचनामा नोंदवहीमध्ये केला पाहिजे व सदर पंचनामा नोंदवहीवरून तलाठी यांनी जावक क्रमांकासह पंचनामा प्रमाणपत्र शेतकऱ्यांना दिले पाहिजे. अदलाबदल दस्त नोंदणीवेळी पक्षकारांनी सदर पंचनामा दस्तास जोडला पाहिजे.
- सलोखा योजनेंतर्गत दस्तामध्ये अधिकार अभिलेखातील सर्वसमावेशक शेरे, क्षेत्र, भोगवटादार वर्ग / सत्ताप्रकार, पुनर्वसन / आदिवासी / कूळ इ. सर्व बाबी विचारात घेऊन दोन्ही पक्षकारांनी सर्वसंमतीने हा अदलाबदल दस्त नोंदवित आहे, अशा प्रकारची अट दस्तामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे.
- पहिल्या शेतकऱ्याच्या शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे या व्यतिरिक्त इतर वैयक्तीक जमिनींचे अदलाबदल करण्याबाबतच्या प्रकरणांचा सलोखा योजनेत समावेश असणार नाही किंवा अशी प्रकरणे मुद्रांक शुल्क व नोंदणी फी सवलतीस पात्र असणार नाही.
- सदर योजनेमध्ये पहिल्याचा ताबा दुसऱ्याकडे व दुसऱ्याचा ताबा पहिल्याकडे असणाऱ्या जमिनीच्या दोन्ही बाजूकडील क्षेत्रामध्ये कितीही फरक असला तरी ते या योजनेसाठी पात्र ठरतील.
- अकृषिक, रहिवासी तसेच वाणिज्यिक वापराच्या जमिनीस सदर योजना लागू असणार नाही.
- सलोखा योजना अंमलात येण्यापुर्वी काही पक्षकारांनी जमिनीची अदला-बदल केली असेल किंवा अदलाबदल दस्तासाठी अगोदरच मुद्रांक शुल्क व नोंदणी फी भरली असेल तर त्याचा परतावा मिळणार नाही.
- सदर योजनेमध्ये दोन्ही पक्षकारांची जमीन ही यापूर्वीच – तुकडा घोषित असेल तर त्याबाबत प्रमाणित गटबुकाची प्रत दस्तास जोडून अदलाबदल दस्त नोंदवून त्याप्रमाणे दस्ताचे वस्तुस्थितीनुसार फेरफाराने नावे नोंदविता येतील.

**योजनेचा लाभ घ्यायची पद्धत:**

- ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीचार वाद आहे ते जवळच्या तलाठी कार्यालयात अर्ज करू शकतात.
- अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे.
- तलाठी आणि मंडळ अधिकारी वादाची सत्यता तपासतील आणि दोन्ही पक्षांना ऐकून घेतील.
- तडजोड होत असल्यास, तलाठी आणि मंडळ अधिकारी कराराचा मसुदा तयार करतील.
-
- दोन्ही पक्षांनी करारावर स्वाक्षरी केल्यानंतर तो अंमलात आणला जाईल.

**योजनेचा फायदा:**

शेत जमिनीच्या वादासाठी शेतकऱ्यांना न्यायालयात जाण्याची गरज नाही, ज्यामुळे त्यांचा वेळआणि पैशाची बचत होते. तसेच मनस्ताप देखील कमी होण्यास मदत होतो.

- वाद त्वरित निकाली काढले जातात, ज्यामुळे शेतकरी शांततेने शेती करू शकतात.
- ग्रामीण भागात शांतता आणि सलोखा राखण्यास मदत होते.

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ॲड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

## आठवणींच्या गोष्टी



राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३७४४३९६..

# कवी, गायक संतोष गमरे



गायक संतोष गमरे.

**गायक संतोष गमरे.**
गाव मौजे धामापूर( लुंबिनी नगर)
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. परिस्थिती अभावी 11 वी मधेच शाळा सोडली. पण वाचन आणि लेखण सोडल नाही. 1998 दहावी, 1998 ला स्मृतिशेष ज्येष्ठ बौद्धाचार्य. अमृता पांडुरंग जाधव (सरंदकर )यांच्या मार्गदर्शनातून धम्म कार्य आणि धार्मिक प्रशिक्षण घेऊन धम्म संस्कार करिता १९९८ ला सनद प्राप्त केली.

2006 ला पुन्हा मुंबईत चैत्यभूमी येथे बौद्धाचार्य शिबीरात आजपर्यंत सहभागी होत आहेत. बालवयात अगदीं शालेय जीवनापासून गाण्याची आवड.. संपूर्ण कुटूंबच कलाकार.. आजोबा तमाशावाले. लोककलावंत वडील उत्तम ढोलकी पटू आईला गायनाची आवड. अगदी घरातच सर्व कलाकार..... वडिलोपर्जित वारसा...त्यातूनच हा कलाकार घडला.

मुंबईत 1999 ला आल्यावर त्यांना सहवास लाभला.. ते कवी.. संतोष तुकाराम गमरे (दापोली ) बाळकृष्ण गोविंद गमरे धम्मपाल गोविंद गमरे.यांनीच  कवालीचा मार्ग दाखवला.. आणि पहिला कार्यक्रम गायिका नंदा शिंदे, अष्टशीला बनसोडे यांच्यासोबत झाला.. 2001 मध्ये त्यानंतर.प्रख्यात गायिका नंदा नांद्रेकर, दीपाली शिंदे, सुहासिनी शिंदे, सुशीला पुणेकर,उमा भारती अशा अनेक गायिका सोबत वैचारिक कार्यक्रम झाले.

तीन बहिणी, आई-वडील असं सहा व्यक्तीचं कुटूंब. परिस्थितीशी झगडा देतं बसपास करिता महिन्याला तीस पस्तीस रूपये नसल्याने शिक्षणासाठी काही मैल पायी प्रवास. काताच्या भट्टीवर कामं करत असताना रेडिओ, कुठेतरी जलशाची ऐकलेली गाणी गुणगुणणे , थट्टा मस्करीनी आपला ठसा उमटविला. मुंबईत २००४चैत्यभूमी येथे बौद्धचार्य शिबिरात सहभागी होऊन योग्य मार्गदर्शन घेतलं आज मुंबईत अनेक ठिकाणीं ते धम्म संस्कार विधीसाठी लोकं त्यांना आदराने निमंत्रीत करतात पणं त्याचं बरोबर मुंबईत गावी अनेक विहारात जावून ते विवीध विषयावर धम्म प्रवचन देतात. अतीशय अभ्यासपूर्ण, निर्भीडपणे आपला विचार ते पटवून देतात, समोरील व्यक्तीच्या मताचा आदर करतात. त्याचीही बाजू समजून घेतात. मुंबईत प्रायव्हेट सेक्टर मध्ये कामं करून प्रथम कुटूंबाचं रक्षण मग सामाजिक धार्मिक  कार्य आणि त्याचं जोडीला गीत लेखन गायन मधून प्रबोधन करतात. स्त्री पुरुष कव्वाली जुगलबंदी करतात पणं ती धार्मिक सामाजिक विषयावर आधारित मनोरंजन आणि त्यातून प्रबोधन जे प्रबोधन लहान मूल तरूण मुल मुली महिला पुरुष एकत्रित बसून ऐकतात.कार्यक्रम नियोजनसाठी येणाऱ्या मंडळाला ते स्पष्ट सांगतात पोटासाठी मला नोकरी आहे. मी धार्मिक संस्कार करतो मात्र कुटुंबाकडून मिळालेला कला वारसा मी जपतोय कारण चळवळीचं हे प्रमुख माध्यमं आहे. तेव्हां तुम्हाला अपेक्षित लोकगीत, द्विअर्थी गीत मी गाणार नाही पटत असेल तर बोलवा असं त्यांनी अनेकांना सांगितलं आणि काही कार्यक्रम रद्दही केलें. कलावंतामध्यें असा स्पष्टवक्तेपणाची भुमिका हवी, त्यांचे विचार, तत्व माझ्याशी जुळतात म्हणूनच या बंधूंशी वयात पंधरा वर्षाचा फरक असून घट्ट मैत्री आहे.... बुद्ध विहारात का जावे... कवी लिहीतात

**"पंचशीला अन् त्रिसरणाने
जीवनाचे मंगल व्हावे
त्यासाठी आधी तू बुद्ध विहारात जावे "
काय प्रज्ञा काय शांती
कुणी दिली ही समता
या साऱ्यांची मिळती उत्तरे
विहारामध्ये जमता.
दुर्गुणाला थाराच नाही
सद्गुणातच न्हावे..**

या कवीचं आणखी एक गीत मला खुप आवडत

**"तुझे कुठवर आयुष्य आहे
कुणास नाही ठावे.. ..
उद्याचे काय कुणी पाहिले
आज खुशीनें जगावे "
रमाईचा त्याग लिहितात,
"त्यागात त्याग रमाईचा त्याग
सुख विलासाची केली नाही हाव
असं कमाविल रमाईनें नाव."
"बौद्ध आहे मी ज्याला त्याला
ओरडून सांगते ही मालू
ही मालू, एक नंबरची हाय चालू "**

असं एक विनोदी पणं अंधश्रद्धे वर प्रहार करणारं दुटप्पी विचार सांगणाऱ्या बोधामृत देणारी अशी अनेक गीत ते गातात. गेली काही वर्षे ते माझही एक गीत साभिनय गातात

**"तुझ फिटतील ग पिढ्यान् पिढीच हाल
सखू बाय पोरीला शाळेत घाल "**

या कलावंताने अनेक कॅसेट सी डी त ही गीते गायली आहेत. ते कविताही ऊत्तम लिहितात.काही प्रातिनिधीक कविता संग्रहात, आणि वर्तमानपत्रातही त्यांच्या कविता प्रकाशित झाल्या आहेत. एखादया विषयावर ते समिक्षणात्मक छान बोलतात.कलावंत सर्वांगीण असावा ते गुण त्यांच्या ठायी

(पान ७ वरून)

## महाराष्ट्रातील पहिले शक्तीपीठ असलेल्या तुळजाभवानी देवीच्या प्रथा आणि परंपरा.



विलास भिमराव कोळी.
फोन नं. ९७६३०८४४९९



देशभरातून तुळजापुरात येणाऱ्या भाविक भक्तांना फक्त तुळजाभवानीचे मंदिर व तेथील परिसर अशा काही ठरावीक गोष्टी माहीत असतात. परंतु यापलीकडे जाऊन पाहिल्यास तुळजापूरकरांनी अनेक अशा प्रथा- परंपरा जपलेल्या आहेत, त्या ऐकल्यानंतर नवीन माणसाला त्याविषयी नवल वाटल्याशिवाय राहणार नाही.

**तुळजापूरची भवानीमाता हे अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत. वर्षातून एकदा तरी तुळजापूरला जायचं आणि देवींचं दर्शन घ्यायचं ही प्रथा कित्येक घरांमध्ये आजही नेमाने सुरू आहे. मात्र तुळजापूरला जाऊन देवीचे दर्शन घेऊन येणाऱ्या तुळजापूर मधील कित्येक प्रथा-परंपरांबद्दल माहिती नसते म्हणून हा लेखन प्रपंच.**

तुळजाभवानीचे पहाटेचे चरणतीर्थ, सकाळ व सायंकाळची महापूजा तसेच रात्रीची प्रक्षाळपूजा व इतर प्रत्यक्षात ज्या पूजा होत असतात, त्या वेळी देवीला प्रत्यक्ष स्पर्श करण्याचा अधिकार मात्र फक्त पानेरी मठाचे महंत व कदम पुजारी या घराण्यातील स्त्री- पुरुषांना असून आजही ती परंपरा कायम आहे. यांच्या व्यतिरिक्त कुणीही असलातरी तो देवीच्या मूर्तीला स्पर्श करून दर्शन घेऊ शकत नाही.

**देवीचा निद्राकाल:-** उत्सवापूर्वी देवीला मूळ स्थानावरून उचलून शयनगृहात झोपविले जाते. याला देवीचा निद्राकाल असे म्हणतात. त्यानुसार भाद्रपद वद्य अष्टमी, आश्विन शुद्ध एकादशी आणि पौष शुद्ध प्रतिपदेला देवीचा निद्राकाल असून त्यांना अनुक्रमे घोर निद्रा, श्रमनिद्रा आणि सुखनिद्रा म्हटलं जातं. देवीच्या निद्राकालाची परंपरा शतकानुशतकं आजही कायम आहे. तुळजाभवानीची मूर्ती जागेवरून सहजपणे काढता येते व तेवढ्याच सहजपणे पुन्हा जागेवर बसवता येते.  घोरनिद्रा, श्रमनिद्रा आणि सुखनिद्रा या नावाने चालणारा देवीचा निद्राकाल आजही तेवढ्याच परंपरेने जोपासला जातो. अन्य कुठल्याही देवाला या प्रकारे सहजपणे उचलून झोपविण्याची पद्धत नाही.

निद्राकालावधीत देवी ज्या पलंगावर झोपतात तो पलंग अहमदनगरमधील पलंगे नावाच्या तेली घराण्याकडून दिला जातो. तर पलंग तयार करण्याचं काम आंबेगाव-घोडेगाव मधील ठाकूर घराने यांचेकडे आहे. दसऱ्यापूर्वी एक महिना अगोदर हा पलंग धुणं अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यातून मिरवत तुळजापूरला येत असतो. यातील विशेष बाब म्हणजे तुळजाभवानीचा पलंग जुन्नरला गेल्यानंतर शिवनेरी किल्ल्यासमोर विश्रांतीसाठी ठेवला जातो.

दुसरी विशेष बाब म्हणजे मूर्तीला सिंहासनावरील खाचीत बसविण्याकरिता दीड फूट लांबीचा क्रुस मूर्तीच्या खालच्या बाजूला असून मूर्ती घट्ट बसावी म्हणून त्याच्या आजूबाजूने मेण भरले जाते. मंदिर संस्थानकडे सर्व आर्थिक कारभार असतानाही मेण पुरविण्याची जबाबदारी परंपरेने पाणेरी मठाच्या महंताकडे आहे.

तुळजाभवानीची पूजाअर्चा करण्याचं काम वर्षभर स्थानिक पुजारी करत असले तरी पालखी आणण्याचा मान मात्र नगरजवळील भिंगारच्या भगत घराण्याकडे आहे. तर परंपरेने पालखीच्या पुढच्या खांद्यांचा मान बार्शी तालुक्यातील आगळगांव गोरमाळय़ाच्या लोकांचा आहे.

सीमोल्लंघना करिता मूळ मूर्ती पालखीत घालून मिरविली जाते. देवीला ज्या पालखीतून मिरविली जाते ती आणण्याचा मान नगरजवळील जनकोजी तेली (भगत) घराण्याकडे आहे. जनकोजी तेल्याच्या घराण्याचा मान म्हणून पालखी तर आहेच, शिवाय देवीला सीमोल्लंघन करिता सिंहासनावरून हलविण्या पूर्वी तेल्याचे वंशज आपल्या करंगळीच्या रक्ताचा टिळा देवीच्या चरणाला लावण्याची प्रथा होती.

तुळजाभवानीची पालखी आणण्याचा मान भिंगारला असला तरी प्रत्यक्षात पालखी तयार करण्याचा सन्मान मात्र राहुरीकरांना आहे. पालखी तयार करताना सर्व समाजातील लोकांना त्यात सामावून घेतलेले आहे. पालखीचे सुतारकाम, लोहारकाम आणि रंगरंगोटीचे काम राहुरी येथे पूर्ण केले जाते.

देवीच्या शिरावर मुकुट बसविण्यापूर्वी देवीच्या मस्तकी पानाची चुंबळ करावी लागते. ते पान पुरविण्याची जबाबदारी तांबोळी नामक मुस्लिम घराची आहे. हे तांबोळी घराणे नवरात्रीत आपल्या घरी परंपरेने घटस्थापनासुद्धा करते. त्यानुसार मंदिरातील अनेक कामे परंपरेने एकाच घराण्याकडे अखंडपणे चालत आलेली आहेत. त्यामध्ये जाधव घराणे नगारा वाजविण्याचे काम करते. कदम घराण्यातील घरे घंटी वाजवितात. पलंगे देवीच्या पलंगाची सेवा करतात, न्हावी

(पान १० वर)

गजाल

## सणासुदीक आसाच....



रीना पास्ते परब
पुणे

"गो कवग्या फाल्या कालेजात जावक भायर पडलं काय माका साद घालून जा. बाजारातसून घसघशीत पाती घेवन ये, माउलीची घोटी भरूची हा माका. पैशे दितय मिया..." थोरलेन चुलीकडल्या खिनकेतसून बायाक सांगल्यान. बाया निकता कालेजातसून यवन भायरल्या माडाबुडी हात पाय धुय होता. "फाल्या बेगीन जातलय गे... रातीच पैशे दिवन ठेय..." बायान धुतलले हात झाडीत उत्तर दिला.
"होय... होय... दितय हुनत थोरली रानुक लागली. बाया घरात यवन हात पाय पुसाच्या आदी आवशीच्या नावान आरडाक लागला.
"गे माका भूक लागली, जवक घाल... अभ्यास करूचो आसा परत..." बाया आवशीक जवक घालून सांगान होवरेत गेला. आवशीन भातार डाळ घालून लोनचा बाजूक वाढून ताट वळयत हाइन ठेयला. बाया होवरेतसून भायर इला. डाळ बगून दनदनुक लागला.
"रोज रोज कसला डाळीचा पानी ढवळून ठेयत गे... तोंडाक दुकू काय नाय करूक... श्या..." बाया बडबड करूक लागला.
"जवचा नाय तर ताट व्हरान भुतुर ढाकुन ठेय... तुका व्हया ता तिया करून खा..." आवशीन येकदाच उत्तर दिला तसा बायान रागान ताट चुलीकडे व्हरान आपटल्यान... होवरेत जावन पुस्तका फुड्यात घेवन बसला. त्याका राती देवळाकडे खेळाक जावचा होता हुनान ता घाय मारून अभ्यास पुरो करूच्या ईचारात होता. चार पाना कशीतरी वाचून काढल्यान. लिव्हचा काम आजून हातीत घेवक नाय होत्यान. वयी दप्तरातसून भायर काढल्यान खरी पुन पोटात भुकेन कावळे आरडाक लागले. "मराने जावन जयतय..." हुनत बाया चुलीकडे यवन ताच ताट घेवन जवक बसला.
"डाळीचा पानी नको होता मगो तुका...? चुरचुरला तसा जवक बसलस... नको नको जावया... फुडे काय गो...?" आवशीन बायाची मस्करी केली....
"हा हा... तुजा व्हायन चाटून पुसान खावचय नाय मिया... घातलंस तितक्या पुरे माका..." बाया जयता जयता आवशीक बोलला. जवन जाला तसा उठान हात धुवन ता अभ्यासाक बसला. दोन तास बसान अभ्यास करून त्याना उद्याचा दप्तार भरून ठेयला. आता बाजूक ठेयललो मोबाइल घेवन ता मेसेज बगूक लागला. मोबाइल बगता बगता त्याका निज लागली. डोळो लागलो नाय लागलो हुनाक त्याका आवशीन साद घालून चाय खावक बोलयलेन. बाया कंटाळत उठला. तोंडक पानी लावच्या आदीच चाय वांगडा फरसान घेवन ता लोट्यार यवन बसला. तितक्यात त्याका मायाचो फोन इलो.
"सांजे साताक आंब्याबुडी भेटाया. थयसून देवळाकडे जावया". असा सांगान मायान फोन ठेयलो. बाया उठान तयारी करूक लागला. देवळाकडे खेळाक खूप लॉका असतत. आजूबाजूचे पॉर खेळाक कमी नि पोरांका बगूक जास्ती यतत ह्या बायाक म्हायती होता. त्याना बरो ड्रेस काढून ठेयल्यान. मॅचिंग कानातले शोधून ठेयल्यान. बाया पाटल्या दारा जावन बरे हात पाय धुवन इला. ड्रेस घालून तयारी करी होता तितक्यात बायाचो बापुस इलो. बाया पावडर हातीत घेवन लावक जाय होता तितक्यात बापाशीन वयल्या वाडीयेक कोन तरी म्हातारो मेल्याचा सांगल्यान. बायान वयतागत पावडर कोपऱ्यात उडयल्यान.
"गो मिया वयल्या वाडयेक जावन यतय... न्हानयेत आग घालून ठेय..." बायाच्या बापाशीन चलता चलता सांगान कपडे बदलून तो भायर दुकू पडलो. बायाची आवस न्हानयेत आग घालूक पाटल्यादारा गेली. बायान गपचूप ड्रेस काढून मायाक फोन केलो. यवक गावाचा नाय हुनान सांगान ता वळयत यवन बसला. टीव्हीचो रिमोट घेवन नाचणारी गाणी बगीत ता मोबाइल चाळूक लागला. आता सुतीक सरता हुनासर घट उठतले मगे काय खेळाक गावाचा नाय ह्या बायाक कळान चुकललं.
"गो बाया मिया थोरलेक सांगान यतय, ती घोटी भरूची तयारी करी होती..." बायाची आवस बायाक सांगत थोरलेकडे गेली. बाया आता घरात यकलाच होता. बायान टीवीचो आवाज मोठो केल्यान. गाणी मोठ्यान वाजल्यार बायाक नाचानसा दिसला. बायान फुडला दार वायच आड केल्यान. वळयत बाया खेळाक लागला. आवस गजाली मारीसर बाया उडये मारून मारून मनासारा खेळला नाचला. आवस इली त्यवा दमान खुरचेर बसला.
"काय गो काय करी होतंय... हावड लागली कशी काय...? नाचा होतंय काय...?" आवशीक बरोब्बर कळला ह्या बगून बाया हसाक लागला. आवसदुकू हसत हसत पाटल्यादारा जावन तापलंला पानी वतून ठेवन घरात इली.
"सणासुदीक सुतीक जाला काय पोरांका कायच करूक गावना नाय... माऊलीच्या देवळाकडे धा दिस पॉरा खेळतली होती. आमच्यासारी बायलमानसा बगूक वायच जातली होती... कसला काय..." बायाची आवस घोवाचे कपडे लागी करता करता बॉला होती. बाया आता टीवीचो आवाज कमी करून बातम्या लावन होवरेत गेला. काडललो ड्रेस घडी मारून यवस्थित ठेवन ता परत अभ्यासाक लागला......

## दांडीयातलो फॅशन शो

मालवणी मुलखात



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.



पुर्वीचो नवरात्रीचो जागर आणि सध्याचो नवरात्रोत्सव हेच्यात जमीन अस्मानाचो फरक दिसता. पुर्वी आमच्या ल्हानपणी गावात नवरात्रोत्सव नि आताच्यासारखे दांडीया खय व्हते? रात्री बापये देवळात जायचे, भजना करायचे, भजी नि चायचो फराळ आणि मगे उशीरापर्यंत पत्ते कुटीत बसणा असोच तो जागर असायचो ना.
आताच्या नवरात्रोत्सवाची मजा काय गे बाय सांगा मी! पुर्वी मुंबैत दिसणारो दांडीया आता गावागावात पोचलोहा. आता भजना, आरती फक्त नावापुरते. भजनात बसाक भजनकारी जमवना म्हणजे बुवांच्या नाकीनऊ येतत. पण भजन संपता कधी नि दांडीया कधी सुरु होता ह्येची तरुणाई वाटच बघीत असता. बरा, आताचे दांडीया तरी पुर्वीसारखे ऱ्हवलेहत? दांडीयाच्या माध्यमातून कितीतरी उप स्पर्धा, मोठमोठी बक्षीसा, काय नि काय!
गुदस्ताची गजाल. आमच्या आवाटाचो दांडीया सुरु झालो. दांडीयाची गाणी लागली तशे सगळ्यांचे हात पाय थिरकाक लागले. कोणीतरी आधीच जाहीर केल्ल्यान, आज दांडीया आसाच, पण तेच्यातच फॅशन शो पण आसा. फॅशन शोच्या स्पर्धेत जे जिंकतले, त्येंका मोठमोठी बक्षीसा ठेवलली आसत. झाला! फॅशन शो म्हटल्यावर आताची पोरा, पोरगे ऐकतत काय ओ? काय एकेकान फॅशन नि अवतार केलल्यान ता काय बोलणार! वयलो भगो तर संपूर्ण अंगभर फाटलला कांबळाच नेसान इललो. शर्ट नाय, पॅन्ट नाय. अंगाभोवती फक्त लपेटलला नि नेसलला कांबळा. कांबळ्याचे लोंबणारे दशये आणि एकंदरीत भग्याचो अवतार बघून सिनेमातलो टारझनच डोळ्यांसमोर दिसाक लागलो.
तसाच कांबळा सावरीत हातात टीपरे घेव्न भगो दांडीया नाचाक लागलो. भग्यासारखे आणिकय बरेच जण असे काय काय निरनिराळे अवतार करून इलले. दांडीयाक जोर इलो तसे सगळे अगदी खुलान नि देहभान विसरून नाचाक लागले. दांडीयाच्या गाण्यांचो जोर आणखी वाढलो. फाल्गुनी, बाबलाच्या आवाजान आणखी जोर धरल्यान. टीपऱ्यांचे ठेके वाढत गेले. टीपरेंवर टीपरे पडाक लागले नि एका क्षणी भग्यासोबत नाचणाऱ्या सुमग्याचो पाय भग्याच्या लोंबणाऱ्या कांबळ्यात अडाकलो. बरा, भगोय नाचण्या दंग, सुमग्याय दंग! दुसऱ्याच क्षणी सुमग्याच्या पायात अडकलेल्या कांबळ्यान भग्याची साथ सोडल्यान. कंबरेचा कांबळा सुटला तरी भगो आपलो नाचताहा! भगोच कशाक, सुमग्याकय आपल्या पायामुळा काय घडला त्येचो पत्तो नाय. ताय आपला नाचताहा! पण सगळी फिदी फिदी हसाक लागली तसो भगो आपल्या कंबरेकडे बघता तर काय, कांबळा जाग्यार नाय! आपलोच अवतार बघून भगो वशाळलो. लाजलो नि खाली मान घालून जमीनीवर पडलला कांबळा एकठय करून हळूच बाजूक गेलो नि अंधारात दडान बसलो. नंतर सुमग्याक जेव्हा समजला की आपल्यामुळा भग्याची काय दशा झाली, सुमग्याय लाजान बाजूक झाला नि पेळेवर जाव्न बसला. दांडीया संपलो नि फॅशन शो चो निकाल जाहीर झालो. उत्तेजनार्थ, तृतिय, द्वितिय करता करता शेवटाक प्रथम क्रमांक... नि काय ओ आश्चर्य, प्रथम क्रमांक भगो नि सुमग्याच्या जोडयेक जाहीर झालो. अनाउन्सर आपलो परत परत अनाउन्स करताहा, प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरलेत, भगो नि सुमग्या... पण बक्षीस घेव्क भगो जाग्यावर खय व्हतो?

डी.डी.एस डेंटल केअर
DDS Dental Care
डॉ.राजेश ज्ञानदेव सावंत
डेन्टल सर्जन
बी.डी.एस्.
सुविधा
दातांचा एक्स रे
रुट कॅनल ट्रिटमेंट
दात काढणे
फिक्स दात बसविणे
कॅप/ब्रिज बसविणे
दात साफ करणे
दातात कॉम्पोझिट सिमेंट भरणे
9373613138
पाट-म्हापण बाजारपेठ, डॉ.दिपक ठाकूर कॉम्प्लेक्स, पहिला मजला, सैनिक बँक शेजारी



# घेवर



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**राजस्थानी घेवर ही एक पारंपारिक आणि लोकप्रिय राजस्थानी मिठाई आहे, जी प्रामुख्याने सणांमध्ये, विशेषतः तीज आणि रक्षाबंधनसारख्या सणांमध्ये बनवली जाते. घेवर हे हलकं, कुरकुरीत आणि साखर-चाशनीत बुडवलेलं गोड पदार्थ आहे. चला, त्याची रेसिपी पाहूया:**

**साहित्य:**

**घेवरसाठी:**

- मैदा: २ कप तूप: १/४ कप (गरम केलेलं)
- दूध: १/४ कप पाणी: ३ ते ४ कप (अंदाजे)
- बर्फाचे तुकडे: २-३ तूप: तळण्यासाठी

**साखरेची चाशनी:**

- साखर: १ १/२ कप पाणी: १ कप
- इलायची पावडर: १/२ टीस्पून
- केशराचे धागे: ८-१० (वैकल्पिक) लिंबाचा रस: १ टीस्पून

**सजावटीसाठी:**

- पिस्ते आणि बदामाचे काप: २ tsf चांदीचा वर्ख (वैकल्पिक)

**कृती:**

**स्टेप १: घेवरसाठी मिश्रण तयार करा**

1. एका मोठ्या परातीत मैदा घ्या. त्यात गरम तूप घाला आणि नीट मिसळा .आता यात दूध घालून मिश्रण करा. नंतर पाणी थोडं-थोडं घालून दाट मिश्रण तयार करा. हे मिश्रण पातळसारखं असायला हवं, जसं डोश्याचं पीठ असतं. हे मिश्रण चांगलं मिसळा आणि बर्फाचे तुकडे घालून हे मिश्रण १०-१५ मिनिटं ठेवून द्या.

**स्टेप २: घेवर तळणे**

1. **त**ळण्यासाठी तूप एका खोल कढईत गरम करा. कढईतील तूप चांगलंच गरम झालं पाहिजे. आता एका मोठ्या चमच्याने किंवा कडप्याने तूपात घेवरचं मिश्रण सोडा. मिश्रण केंद्रापासून घालून बाहेरपर्यंत पसरा. मिश्रण टाकताना झरेसारखे पडावेत, जेणेकरून घेवरला त्याची खास रचना मिळेल. तळताना वरून अजून मिश्रण टाकत राहा. घेतलेल्या घेवरच्या कडांनी सोनेरी रंग येईपर्यंत तळा. तळून झाल्यावर घेवर एका ताटात काढून टिश्यूवर ठेवा, जेणेकरून उरलेलं तूप निघेल.

**स्टेप ३:** साखरेची चाशनी तयार करा

1. एका भांड्यात साखर आणि पाणी एकत्र करून उकळा.चाशनी थोडी घट्ट होईपर्यंत उकळत राहा. एका घट्टपणावर पोचल्यावर, त्यात इलायची पावडर आणि केशर घाला. शेवटी चाशनीत लिंबाचा रस घाला जेणेकरून चाशनी क्रिस्टलाइज होणार नाही.

**स्टेप ४: घेवरला चाशनीत बुडवा**

1. तळलेला घेवर थोडा गार झाला की, त्याला तयार चाशनीत बुडवा.

# नवदुर्गोत्सव

**(पान ६ वरून)**

उपेंद्राय नमः । हरये नमः । श्रीकृष्णाय नमः याप्रमाणे विष्णूची २४ नावे जपावीत.
प्राणायाम करावा.
गणपती व घरातील देव्हाऱ्यातील सर्व देवतांना स्मरुन वंदन करावे. वडीलधाऱ्यांना वंदन करावे. देशकालाचा उच्चार व पूजेचा संकल्प करावा:
"ॐ विष्णवे नमः। वर्तमान संवत, संवत्सर, अयन, ऋतु , तिथी, वार, नक्षत्र, करण, योग यांनुसार वर्तमान यथायथं राशिस्थित चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र ,शनि, रवी, राहु, केतू इत्यादी ग्रहांच्या शुभ सहयोगाने पुनीत झालेल्या वर्तमान शुभकाली मी स्वतः(आपले नाव घ्यावे) व माझे आप्तेष्ट सहकुटुंबीय यांच्यासाठी श्रुतीस्मृती पुराणोक्त फलप्राप्त्यर्थ, क्षेम, स्थैर्य, विजय, अभय, आयुष्य, आरोग्य, सर्वांगीण अभ्युदय, धर्म अर्थ मोक्ष काम फल, इयादी फलप्रात्यर्थ, अधिदैविक आध्यात्मिक अधिभौतिक त्रिविध तापोपशमनार्थ, शत्रुत्व निवृत्त्यर्थ श्री महागणपती- महादुर्गा- महाकाली- महा महालक्ष्मी- महा सरस्वती तसेच शैलपुत्री ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमात्र, कात्यायनी, कालरात्री, महागौरी, सिद्धीदा इत्यादींचे पूजन करीत आहे." असे म्हणून ताम्हणात पाणी सोडावे.

**पुढे सर्व देवतांची षोडशोपचारे किंवा पंचोपचारे पूजा करावी.**

**माला बंधन करावे:** घटावर वरून खाली प्रत्येक दिवशी पानाफुलांची एक माळ (किंवा पहिल्या दिवशी एक, दुसऱ्या दिवशी दोन, तिसऱ्या दिवशी तीन ..... नवव्या दिवशी नऊ याप्रमाणे चढत्या क्रमाने ) पुढील प्रमाणे उच्चार करून नवदुर्गांना वहावी.
१) पहिल्या दिवशी: माला ही सर्व देवानां प्रीतिदा शुभदा यतः। लंबितासौ मया भक्त्या गृहाण जगदंबिके ॥१॥ ग्रथितां तिलकल्हारजातीमंदार चंपकैः। पुष्पमालां प्रयच्छामि प्रथमेन्हि तवांबिके ॥२॥ श्री महाकाली महालक्ष्मी महा सरस्वती नवदुर्गा देवताभ्यो नमः। पुष्पमाला समर्पयामि ॥३॥

पुढील नऊ दिवस वरील प्रमाणे उच्चार करून माला बांधाव्यात. यामध्ये प्रथमेन्हि च्या जागी दुसऱ्या दिवशी द्वितीयेन्हि, तिसऱ्या दिवशी तृतीयेन्हि, चौथ्या दिवशी चतुर्थेन्हि, पाचव्या दिवशी पंचमेन्हि , सहाव्या दिवशी षष्ठेन्हि , सातव्या दिवशी सप्तमेन्हि , आठव्या दिवशी अष्टमेन्हि , व नवव्या दिवशी नवमेन्हि याप्रमाणे शब्दाचा बदल करावा. प्रदक्षिणा करून नमस्कार करावा. आरती करावी. घटावर व सर्व देवांवर फुले वाहावीत.
ओम यज्ञेन यज्ञमयजंत.... ही प्रार्थना म्हणावी.
आवाहनम न जानामि .... ही क्षमाप्रार्थना म्हणावी व साष्टांग नमस्कार करावा.तीर्थप्रसाद वाटावे.

**।। श्री कालार्पणमस्तु ॥**
**सर्वांना दुर्गोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा!**

# सदरक्षणाय खलनिग्रहणाय

**(पान ५ वरून)**

पंडाळात ड्युटी ते सुद्धा पार त्याच्या पायाशी...तुझावर राजा एकदमच प्रसन्न हाय बघ.काय मागितलं मग? लौकर पाळणा हलू दे? अं.. अं..?"मान खाली घालूनच होती.
तेवढ्यात तिला निरोप आला. "साळुंके सायबांनी बोलावलं" तिच्या छातीत धडधडलं...त्या दिवशीच्या दंगली बद्दल मेमो असणार. "माने बाई.. तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती. तुम्ही पंडाळ सोडून गेलातच कशा...आम्हाला पण वरच्यांना उत्तर द्यावं लागतं. साहेबांनी तुमच्या बदलीचं पत्र दिलंय. डायरेक्टर गडहिंग्लजला..."
"पण सर"
"पण.. परंतु मला काही माहित नाही. ह्या आठ दिवसांत इकडचं दप्तर पूर्ण करा तिथला चार्ज घ्या."
तिच्या पोटात आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. तिच्या गावा जवळ बदली?खरंच न मागता राजा ने आपल्या पदरात किती मोठं दान दिलं. नालासोपाराची चाळ, गाडीतून लटकून केलेला प्रवास, दोन खोल्यातला कसाबसा संसार... सगळ्यापासून अचानक सुटका? तिने मनोमन इथूनच राजाला दंडवत घातलं. चौकीवर सगळे हळहळत होते. साळुंकेच्या नावाने बोटं मोडत होते. पण गप्प राहून ती आपलं दप्तर आवरत होती. राहूलला हळूहळू तयार करू आणि बाबांच्या ओळखीने साखर कारखान्यात कामाला लावू. हे मागणं मात्र आपण स्वतः बाप्पाच्या गाभाऱ्यात जाऊन करू. असा मनोमन निश्चय करून तिने हात जोडले.

**(हा लेख काल्पनिक असून.. कोणत्याही प्रकारची अंधश्रद्धा पसरविण्याचा लेखिकेचा हेतू नाही.)**

# ही देवीची भक्ती नव्हे !

हिंदूंच्या सण-उत्सवांचे गेल्या काही वर्षांपासून बाजारीकरण होत आहे याबाबत कुणाचेच दुमत नसावे. नवरात्रीपासून सुरु झालेला हा प्रकार हळूहळू हिंदूंच्या सर्वच सण -उत्सवांत शिरकाव करू लागला आहे. नवरात्री हा खरंतर देवीच्या भक्तीचा आणि शक्तीचा जागर करण्याचा उत्सव; मात्र या उत्सवाच्या निमित्ताने वेगवेगळी वेशभूषा, केशभूषा करून इतरांमध्ये उठून दिसण्याची चढाओढ महिलांमध्ये लागलेली दिसते. गेल्या काही वर्षांपासून या दिवसांत विविध प्रकारचे टॅटू अंगावर काढून घेऊन मिरवण्याचा ट्रेंड फोफावत चालला आहे. बॅकलेस ब्लाउज घालून उघड्या पाठीवर, किंवा उघड्या दंडावर विविध टॅटू काढून घेतले जातात. त्यासाठी हजारो रुपये खर्च केले जातात. काही ठिकाणी तर टॅटू काढणाऱ्यांचा धंदा तेजीत चालावा या हेतूने टॅटूच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्यांच्या अंगावरील टॅटू अधिक आकर्षक त्यांना बक्षीस दिले जाते. सुरुवातीला श्रीमंतांमध्ये दिसणारा हा ट्रेंड हळूहळू मध्यमवर्गीय महिलांमध्येही शिरू लागला आहे. हिंदू धर्मातील सण-उत्सव हे भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहेत. ते शास्त्रानुसार साजरे केल्यास त्याचा अधिकाधिक लाभ होतो. अशा प्रकारे शरीराचा भाग उघडा ठेऊन त्यावर टॅटू काढून मिरवण्यात कसली आली आहे भक्ती ? हे असले प्रकार देवीला तरी आवडणार आहेत का ?

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

# ड्रीम ११ वेंगसरकर क्रिकेट अकादमीची निवड चाचणी ८ आणि ९ ऑक्टोबरला

**मुंबई :** ड्रीम ११ वेंगसरकर क्रिकेट अकादमीच्या वतीने येत्या ८ आणि ९ ऑक्टोबरला चर्चगेट येथील ओव्हल मैदानात १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

१ सप्टेंबर २०१० नंतर आणि १ सप्टेंबर २०१३ पूर्वी जन्म झालेली मुले या निवड चाचणीसाठी पात्र ठरणार असून सर्व पात्र खेळाडूंनी आपल्या जन्माच्या दाखल्यासह संपूर्ण पांढऱ्या गणवेशात वरील दिवशी दुपारी ३.०० वाजता ओव्हल येथील अकादमीच्या मैदानात उपस्थित राहावे.

**अधिक माहितीसाठी अकादमीचे प्रशिक्षक अमित जाधव यांच्याशी ९८९२६००१५५ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.**

# काव्यांगण

## नवरात्र

नऊ दिस आणि रात सेवा तुझी करतव,
घरातल्या बाईक तुच्छ आम्ही लेखतव..

तुझ्यासाठी आम्ही अनवाणी चलतव,
तीच वान घरच्या बाईवर उगारतव..

तुझ्यासाठी दिस रात उपास आम्ही करतव,
घरातल्या बाईक उपाशी ठेऊन बाहेर मज्जा मारतव..

तुझ्या आगमनासाठी ढोल ताशा वाजवतव,
पोरगी जन्माक इली काय उकिरड्यार फेकतव..

कधी गे तू आमका पावतलय?

माझी सेवा कमी केलस तरी चलात
घरातल्या बाईक सन्मान तू दि...
स्त्री भ्रूण हत्या करू नकोस
तेव्हाच मी तुझ्या पाठीशी खंबीर उभी रवतलय..
हीच खरी माझी सेवा आणि हीच खरी नवरात्र....

**सौ. अश्विनी मंगेश परब**
**ठाकुर्ली, ठाणे**

## जगदंबा महाकाली

भिती अनामिक मनी दाटली,
कलियुगी ही नाती फसवी...
विश्वासाचा गळा
घोटूनी,
घात करती पाठिमागुनी....

कसे जपावे सत्व शीलाचे....
का घ्यावे आता व्रत क्षत्राणिचे,
हे व्याघ्रांगिनी, हे रणरागिनी,
छाटूनी टाक कर तयांचे,
जो सरसाविल छेदण्या शील सतीचे.....

तू जगदंबा, महाकाली
तू,
करण्या रक्षण तुज अस्मीतेचे,
शस्त्र घे हाती आत्मबळाचे.....

**वर्षा कदम,**
**डहाणू**



## जागर स्त्री शक्तीचा

### फातिमा शेख

जातीयतेचा फाडून बुरखा
धावून आली भगिनी
नाव तयांचे शेख फातिमा लढली होऊन रागिणी ll धृ ll

निरक्षरांना साक्षर करण्या विडा उचलला हाती
चिखल दगड अन शेण गोवऱ्या नित्यनेमे झेलती
दीप लावुनी स्त्री शिक्षणाचा अमर झाली मानिनी. ll 1ll

समानतेचे धडे देऊनी साक्षर केली जनता
जाती धर्म अन लिंग भेदण्या उभारीले हो दलिता
सावित्रीच्या संगे शोभते अखंड जीवनदायीनी ll 2ll

समाजाचे तू देणे फेडशी देशसेवा ही थोर
पदस्पर्शाने पावन झाली भारत भू साकार
शिक्षणाच्या संधीतून या मोहरली स्वामिनी ll 3ll

**सौ. सपना सावंत,**
**दापोली**

## उत्सव स्त्री शक्तीचा

उत्सव असे स्त्री शक्तीचा
जागर हा सुनिती सन्मार्गाचा
विनाश कुविचार नि कुर्मांचा
प्रस्ताव प्रस्थापित विश्व शांतीचा!!१!!

रंग वसनांचे सुशोभन सौंदर्याचे
महात्म्य त्यात मात्र प्रत्येक देवीचे
ओटीचे सामान भाव फक्त आमचे
होती सोहळे आईच्या कृपादृष्टीचे !!२!!

आई ती खरीच माऊली जगताची
जशी माय माऊली असे लेकरांची
दृष्टी तिची सर्वांप्रती समानतेची
आशिष आणि कृपाकटाक्षाची!!३!!

मिळावी जन्मोजन्मी अशी छाया
कधीच न व्हावी कमी माया
बालकापरी तू घ्यावे जवळी
आणखी काय हवे जगाया!!४!!

**सुखदा सयाजीराव गोरड**

## तू खड्ग घेऊनी येई माते

तू खड्ग घेऊनी येई माते
खड्ग घेऊनी करीं
या दृष्टांना संहारी माते
खड्ग घेऊनी करी...

या कलियुगी सर्वत्र मातले
दानव ठायीं ठायीं
प्रकटूनी यावे, होई पुन्हा
महिषासुरमर्दिनी
तू खड्ग घेऊनी येई माते...

अबलांवरती करीती हल्ले
दिवसाढवळ्या कुणी
छाटावे कर तें होऊन पुढती
शक्ति तू मर्दानी
तू खड्ग घेऊनी येई माते...

ना राम राहिला न्यायमंडळी
अबलेला ना वाली
उन्माद वाढला जगतीं आता
धावत यावे आई
तू खड्ग घेऊनी येई माते...

नारी अवघी भयभीत सारी
थरथर कापें मनीं
सोडव तिजला हाक मारते
धावत ये सत्वरी
तू खड्ग घेऊनी येई माते...

माणूस उठला माणसांतुनी
स्वैर धावतो जगीं
कुस्करी कळ्यांना निर्दयतेने
वाचव त्यांना झणीं
तू खड्ग घेऊनी येई माते...

**बाबू घाडीगांवकर**



## महाराष्ट्रातील पहिले शक्तीपीठ असलेल्या तुळजाभवानी देवीच्या प्रथा आणि परंपरा.

**( पान ७ वरून )**

समाजाकडे सनई-चौघडा वाजविण्याचे काम आहे. याप्रमाणे हरेक जाती-धर्माला इथं परंपरेनं सेवा बजावण्याचा अधिकार आहे.

लाखोचे दान देणारी तुळजाभवानी पहिला नैवेद्य भाजीभाकरीचा पसंत करते. तो उपरकर घराण्याकडून येतो. देवीची प्रक्षाळ, सिंहासन यांसारख्या पूजेदरम्यान हाताखाली मदत करण्याचे काम पवेकर करतात. भक्ताने सिंहासनपूजा केल्यानंतर देवीजींच्या अंगावरील चिन्हे दाखविण्याचे काम हवालदार करायचा.

सकाळ, दुपार आणि सायंकाळ अशा तीन वेळा दूधखिरीचा नैवेद्य हा कोल्हापूर संस्थानच्या वतीने दिला जातो. त्यासोबत पानाचा एक विडाही दिला जातो.

तुळजाभवानीला उन्हाळ्यात उकाडा लागू नये म्हणून पलंगे सलग तीन महिने देवीजींना वारा घालतात. सिंहासनारूढ देवीजींना वारा घालण्याकरिता पलंगे हातात पंखा घेऊन आपली चाकरी बजावत असतात यासोबतच चैत्रशुद्ध बली प्रतिपदेपासून ते मृगाच्या आगमनापर्यंत दररोज दुपारी देवीला नैवेद्यात सरबत दिले जाते. हे लिंबू सरबत पुरविण्याचे काम वंशपरंपरेने भिसे आणि दीक्षित घराण्याकडे आहे. विनामोबदला ही मंडळी आपले काम चोखपणे करत असतात.

एका दरीत तुळजाभवानीचं ठाणं असून मंदिराची मूळ बांधणी किल्लेवजा असून मंदिर हे हेमाडपंथी शैलीतील आहे. मंदिराचा कारभार सरकारी यंत्रणेकडे असला तरी प्रत्यक्ष देवीची पूजाअर्चा कदम घराण्यातील १६ घरांकडे आहे. यांना भोपे पुजारी तर अन्य घराणी जे देवीचा नवस-सायास पार पाडतात त्यांना पाळीकर पुजारी म्हणतात. तुळजापुरातील पुजाऱ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्याकडे येणाऱ्या भक्ताची ते लेखी नोंद ठेवतात. त्यामुळे वंशपरंपरेने आपल्या कुलदेवतेचा पुजारी हा ठरलेला आहे. साहजिकच आपल्या वंशजांना इतिहास जाणून घेण्याकरिता पुजाऱ्यांचे बाड उपयोगी ठरते. देवीचे पुजारी हे आपल्याकडे येणाऱ्या भक्ताची राहण्याखाण्याची व्यवस्था स्वत:च्या घरीच करतात हे वेगळे पण आहे.

भक्ताला लाखोने देणारी देवी स्वत: मात्र पहिला नैवेद्य भाजी भाकरीचा स्वीकारते. तुळजापुरात देवीच्या सेवेत सर्व जाती धर्माचे स्थान आहे. देवीला टोपासाठी लागणारी पानं पुरविणारे तांबोळी मुस्लीम असले तरी देवीची माळ, पोत, परडी तर पाळतात शिवाय घटस्थापना करतात. देवीच्या नैवेद्यात मांसाहार, तर येथील काळभैरवाला नैवेद्यानंतर गांजाची चिलीम तोंडात दिली जाते. याशिवाय अख्खे गाव अनेक परंपरा पाळते. त्यानुसार नवरात्रीत गादी, उशी आणि पलंगाचा त्याग करतात. काही भक्त चप्पल घालत नाहीत. इतरही अनेक प्रथा आहेत. त्यानुसार कुंभाराचे चाक, तेलाचा घाणा गावात चालवत नाहीत. तुळजाभवानी म्हणजे शाक्त संप्रदायाशी निगडित असल्याने तिच्या प्रथापरंपराही काही वेगळ्याच असणार! त्यानुसार देवीच्या नावाने गोंधळ घालणे आलेच. अशा अनेक परंपरा तुळजापूरवासीयांनी जपल्या आहेत.

देवीच्या परंपरेत काळभैरवाचा भेंडोळी उत्सव महत्त्वाचा आहे. एका काठीला पलिते बांधून ती पेटवून निघालेली ती भव्य ज्वाला यात्रा पाहताना थरकाप उडतो. देवांचे रक्षण करणारा काळभैरव त्याच्या अक्राळविक्राळ रूपाला अनुसरून त्याला रोजचा नैवेद्य मांसाहाराचा असतो. शिवाय त्याच्या तोंडात गांजाची चिलीम पेटवून दिली जाते. ही परंपरा आजही जोपासली जाते.

कालभैरवाचे फिरणे रात्री चे असते. त्याला उजेड हवा म्हणून भेंडोळी उत्सव. भैरोबाच्या नावानं चांगभलं आणि तुळजाभवानीचा उदो उदो करत भेंडोळी अंगावर घेतलेली असते. ही भेंडोळी घेऊन ते अरुंद गल्लीबोळातून जातात. पण या भेंडोळीमुळे त्यांना कधीही इजा झाल्याचे उदाहरण नाही. तुळजापुरात तेल्याचा घाणा, कुंभाराचे चाक, कातडी कमावण्याचा उद्योग इथं चालविला जात नाही. या प्रमाण परंपरेला प्राचीन इतिहास आहे.

म्हणूनच तिच्या दरबारात पाऊल ठेवताच लहानथोर एकच जयघोष करतात.

**आई राजा उदोऽऽ उदोऽऽ!**

# वाचन प्रेरणा दिन विशेष

## वाचन प्रेरणा- काळाची गरज



कु. पुर्वा सचिन जगदाळे
ए.जी. हायस्कूल, दापोली.
इयत्ता- आठवी.

माझ्या आजीला वाचनाचे भारी वेड आहे. दररोज घरात काम करताना हाताला आलेला कोणताही कागद ती वाचल्याखेरीज सोडत नाही. तसे तिचे शिक्षण फारसे झाले नसावे. कारण तिला जसे मराठी अस्खलितपणे वाचता येते, तसे इंग्रजी वगैरे वाचता येत नाही. पण त्याचे तिला फारसे वाईटही वाटत नाही. दुधपाकीटासोबत घरात आलेली कागदी पिशवी, फुलांच्या पुडीचा कागद, कधी कधी आजोबांनी दापोलीतून आणलेल्या वडा-पावच्या पुडीचा कागद वगैरे तिला दिसलेला प्रत्येक कागद ती वाचून काढते. आमच्या घरात तशी फारशी गोष्टींची पुस्तके नाहीत. पण माझी दरवर्षीची मराठीची पुस्तकेदेखील तिला वाचण्यासाठी चालतात. दिवसभरात फुरसतीच्या वेळेत ती माझे घरी राहिलेले एखादे पुस्तक संध्याकाळपर्यंत वाचून काढते. त्यामुळेच ती सहसा कधीच घराबाहेर पडत नसली तरी जगात काय काय चालले आहे याविषयीचे तिला बरेच काही कळते.

ती आता थोडी म्हातारपणाकडे झुकत असली तरी तिची स्मरणशक्ती तल्लख आहे. अगदी तीसपर्यंतचा कोणताही पाढा तिला विचारा, ती अचूक बोलून दाखवते. पाच दोन वर्षांपूर्वी वाचलेल्या एखाद्या पुस्तकातली कथा ती फाडफाड सांगते. मला आजीच्या अशा स्मरणशक्तीचे कौतुक वाटते. तिला तिच्या बालपणात कोणत्या शिक्षकांनी शिकवले असेल? तिचा घरी कोणी अभ्यास घेतला असेल? वगैरे नाना प्रश्न माझ्या मनात पिंगा घालतात. मी एकदा आजीला विचारलेच," काय गं आजी, तुझी स्मरणशक्ती एवढी तल्लख कशी? तुला वाचनाची एवढी आवड कशी? तुला रोज रोज वाचायचा कंटाळा येत नाही का गं?" आजीच्या मते, तिला तिच्या बालपणापासूनच वाचनाची आवड होती. तिचे बाबा त्या काळातले शाळामास्तर होते. शिवाय गावातले सार्वजनिक मोफत वाचनालयही तेच चालवायचे. आजी सांगते, त्या काळात तर आजचे वर्तमानपत्र उद्याच मिळायचे. मात्र तरीदेखील दररोज हातात पडणारे वर्तमानपत्र कधी वाचून काढते याची उत्सुकता लागून रहायची. दररोज वर्तमानपत्र वाचल्याने आपण काळासोबत व प्रवाहासोबत चालत असल्याचा आत्मविश्वास स्वतःमध्ये निर्माण होतो. दररोज काही ना काही वाचल्याने आपल्या शब्दसंग्रहात भर पडते. आपण जे वाचतो त्यातला बराचसा भाग आपल्या डोक्यात राहतो. आपण अशा माहितीचा बोलताना, गप्पा मारताना वा काही मजकूर लिहीताना वापर करतो. चारचौघात जर आपण एखाद्या विषयावर माहितीपूर्ण विवेचन केले, एखादा मुद्दा व्यवस्थित पटवून सांगितला तर चारचौघांत आपली हुशारीही दिसते. आज आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. ए. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम वगैरेच्या अभ्यासपूर्ण भाषणांचे दाखले देतो, त्यांनी लिहीलेले अभ्यासपूर्ण ग्रंथ वाचतो. खरेतर अशी असामान्य व्यक्तिमत्त्वे काही आभाळातून शिकून खाली आली नव्हती. बालपणापासून जोपासलेली वाचनाची व चिंतनाची सवयच त्याना एवढ्या अत्युच्च स्थानापर्यंत घेऊन गेली. भारतात सर्वाधिक पुस्तके वाचणाऱ्यांच्या यादीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव शीर्षस्थानी आहे. निरतंर वाचनाने मेंदूही तल्लख राहतो. बुद्धीला गंज चढत नाही. आपण भारतातील वा जगातील मोठमोठ्या विभुतींची चरित्रे अभ्यासली तर असे दिसते की त्यांनी आयुष्यात भरमसाठ पैशांचा संग्रह केला नाही. पण हजारो, लाखो पुस्तकांचा संग्रह केला, त्यांचे जतन केले. वैचारिक श्रीमंती अशाच सवयीतून येते.

सध्याच्या मोबाईल फोन, इंटरनेट, सोशल मिडीयाच्या जमान्यात तरुण पिढी, विद्यार्थी वाचनापासून, चिंतन व मनन करण्यापासून फार दूर गेले आहे अशी चर्चा ऐकावयास मिळते. सध्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर एका क्लीकवर उपलब्ध होत असल्याने कोणी सहसा वाचन व पाठांतराच्या भानगडीत पडत नाही असाही आरोप केला जातो. मात्र या सर्व सोईसुविधांचा लाभ घेताना, वापर करीत असताना आवश्यक ती खबरदारी घेतली गेली नाही तर अनेक विध्वंसक, समाजविघातक घटना व प्रसंग घडताना दिसत आहेत. आज महाराष्ट्रात स्त्रियांवरील, मुलींवरील अत्याचारांमध्ये दुर्दैवाने कमालीची वाढ झाली आहे. अर्थातच अशा विकृत व अनैतिक घटनांसाठी इंटरनेट व सोशल मिडीया कारणीभूत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आम्हाला शाळेत विद्यार्थी सुरक्षेबाबत आवश्यक ती खबरदारी काय घ्यावी याबाबत आमचे घाडीगांवकर सर नेहमीच आवश्यक ती खबरदारी घेण्याबाबत माहिती देतात. त्यांच्या मते मोबाईल इंटरनेट डेटा व वाय फाय कंपन्यांनी जर दररोजच्या एक जी. बी., दोन जी.बी. किंवा अमर्याद डेटाऐवजी दररोज फक्त शंभर एम.बी. वा तत्सम मर्यादा घातल्या तर लोक, विद्यार्थी मोबाईल फोन, इंटरनेटचा वापर कमी करून आपोआपच वाचनाकडे वळतील. मोबाईल फोनमध्ये जे आवश्यक तेच बघतील, वापर करतील. विद्यार्थ्यांमध्ये वाचन प्रेरणा निर्माण होण्यासाठी अशा प्रकारचे कठोर निर्णय घेण्याची वेळ आली आहे असे मला वाटते. आपण कार्टून सिनेमांतले काल्पनिक सुपर हिरोज बघण्यापेक्षा, त्यांचे अंधानुकरण करण्यापेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांसारख्या अनेक प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांची चरित्रे अभ्यासेवयास व वाचावयास हवीत. अमर्यादित इंटरनेट डेटा, सोशल मिडीया वगैरेंचा फुगा एक ना एक दिवस नक्कीच फुटणार आहे. शेवटी आपणास पुढील काळातील सर्व आव्हानांचा सामना करावयाचा असेल, वाम मार्गावर भरकटण्यापाचून वाचायचे असेल तर वाचनाच्या सवयीला पर्याय नाही. कारण पुढील काळ व नानाविध आव्हानांचा विचार करता असे दिसते की, वाचन ही काळाची गरज आहे.



## दिसामाजि वाचित जावे!



कु. वेदिका सुभाष मुलूख,
ए. जी. हायस्कूल, दापोली.
इयत्ता- आठवी.

शाळेत असताना दिवसभर वाचणे, लिहीणे होतेच. घरी आल्यावर परत गृहपाठ करताना वाचणे होते. घरी गृहपाठ सोडवताना माझ्या काही मैत्रिणी मोबाईल फोनचा, यु ट्युबचा वापर करतात म्हणे! पण मला नाही हो तेवढी सवलत! माझ्या नशिबीच नाही आले असले शॉर्टकट कधी. कारण मी गृहपाठ सोडवीत असताना माझी आई तिचा मोबाईल फोन स्वयंपाकघरात कुठेतरी लपवून ठेवते. शिवाय मी गृहपाठ सोडविताना पुस्तक वाचत्येय ना यावर तिचे बारीक लक्ष असते. तिच्या मते, निरंतर केलेले वाचन कधी वाया जात नाही. आपण जेव्हा एखादा परिच्छेद वा धडा वाचतो, तेव्हाच तो आपल्या स्मरणात राहतो. शाळेत शिकवताना माझे सर मला नेहमी सांगतात, या जगात 'वाचेल तोच वाचेल!' , किंबहुना वाचेल तोच टिकेल! मला सरांचे म्हणणे हल्ली हल्ली पटावयास लागले आहे. वाचणे म्हणजे केवळ पुस्तकात वर वर नजर फिरवणे किंवा 'वाचनाची ॲक्टींग' करणे नव्हे याची सर नेहमी आठवण करून देतात. आपण जे काही वाचतो ते चिरकालापर्यंत लक्षात राहिले पाहिजे. अगदी म्हातारपणी कोणी काही विचारले तरी आपल्याला आपण वाचलेले आठवून सांगता आले पाहिजे. आमचे सर वर्गात शिकविताना अनेकदा गंमतीशीर पद्धतीने शिकवतात. ते दररोज काही ना काही उदाहरणे, दाखले देतच असतात. ते म्हणतात," अगदी तुम्ही म्हाताऱ्या व्हाल, तेव्हा तुमच्या नातवंडांने जरी विचारले, माहीमची खाडी या पुस्तकाचे लेखक कोण? तरी तुम्हाला पटकन सांगता आले पाहिजे, मधु मंगेश कर्णिक. कधी नातवंडाने हट्ट धरला की, आजी सत्तावीसचा पाढा बोलून दाखव ना गं. तरी तुम्हाला त्या वयात तो पाढा सणसणीत बोलून दाखवता आला पाहिजे, न चुकता! वाचन हे असे असावयास हवे. एक दोनदा वाचलेले, पाठ केलेले चिरंतन लक्षात रहायला हवे." सर, नेहमी म्हणतात, दररोज काही ना काही वाचा. वाचन वाढवा, वाचन वाढवा!" परंतु अनेकदा प्रश्न असा पडतो की, दिवसा शाळेत खूप काही वाचतो, घरी आल्यावरही वाचतो, मग अधिक आणखी काय काय वाचावयाचे? मी तर एकदा सरांना ठाम विचारलेच," हे इतके मी दररोज वाचते, तर याहून अधिक काही वाचावयाची गरज आहे का?"

पण मग सर समर्थ रामदास स्वामींचे उदाहरण देतात. संत रामदासस्वामी लोकांना सांगायचे, " दिसामाजि वाचित जावे ! यंदा आम्ही अगदी जून महिन्यात शाळा सुरु झाल्यापासूनच शाळेत 'महावाचन' करीत आहोत. गेल्या काही वर्षांपासून वाचनालयांकडे फिरकणाऱ्या माणसांची, मुलांची रोडावलेली संख्या, शाळेतल्या ग्रंथालयात धूळ खात पडलेली पुस्तके, माणसांच्या, मुलांच्या दैनंदिन जीवनात मोबाईल फोन नावाच्या 'व्हायरस'ने मांडलेला उच्छाद, मोबाईल फोनमध्ये एका क्लीकवर उपलब्ध होणारी आवश्यक माहिती आणि अशा माहितीचे स्तोम विचारात घेता आजची पिढी प्रत्यक्ष वाचनापासून फार दूर गेली आहे असे शासनाच्या लक्षात आल्याने आता शासनाने सर्व शाळांमधून 'महावाचन अभियान ' सुरु केले आहे. या अभियानाच्या निमित्ताने मी तरी या वर्षी अनेक पुस्तकांचे वाचन केले आहे. वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाबद्दल मला सुचलेले अभिप्राय वहीत लिहून ठेवले आहेत. माझ्या अशा अभिप्रायांचे व्हिडीओ, ऑडीओ देखील माझ्या शाळेमार्फत पुढे पाठविले आहेत. या महावाचन महोत्सवात सहभागी झाल्याचे अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे मला निश्चितच झाले आहेत. शाळेकडून तसेच दापोलीतील 'क्षितिज कला मंच' नावाच्या संस्थेकडून आमचे सर्व विद्यार्थ्यांचे फार मोठे कौतुक झाले. शालोपयोगी साहित्याची बक्षिसे मिळाली. आम्हाला साक्षात मुख्यमंत्र्यांच्या, शिक्षणमंत्र्यांच्या सहीचे सन्मानपत्र मिळाले. आमच्या शाळेच्या, आमच्या सहभागाच्या बातम्या वर्तमानपत्रात झळकल्या, आणि मुख्य म्हणजे आमची शब्दसंपदा वाढली. अनेक पुस्तकांची, लेखकांची, पुस्तकात वाचलेल्या विषयांची माहिती झाली. आता एखाद्या विषयावर शाळेत बोलायचे म्हटले तर आपोआप शब्द सुचतात, वहीत लिहीताना पटपट आठवतात, कित्ती कित्ती फायदे झाले म्हणून सांगू?

अरे, खरी गंमत तर सांगायचीच राहिली. यंदा अशी पुस्तके वाचता वाचता, चाळता चाळता एके दिवशी अगदी आकर्षक मुखपृष्ठ असलेल्या एका पुस्तकाने माझे लक्ष वेधून घेतले. निरखून बघते तर काय, 'वणवा' नावाच्या त्या पुस्तकाचे लेखक होते माझे सर, घाडीगांवकर सर. आता बोला! गेली दोन वर्षे ते मला शिकवितात. तरी मला माहीतच नव्हते की, ते एक लेखक आहेत. ते कविता लिहितात, कथा लिहीतात, लेख लिहीतात! मी आमच्या सरांचे ते पुस्तक पूर्ण वाचून काढले. मला ते पुस्तक वाचताना त्यातल्या गोष्टी जणु काही आपल्या अवती भवतीच्याच आहेत असे वाटले. मी सरांना बोलले," सर, मी तुम्ही लिहीलेले 'वणवा' हे पुस्तक वाचले." सरांनाही फार आनंद झाला. आता मला कळले की, समर्थ रामदास स्वामींसारखी संतमंडळी इतक्या शेकडो वर्षांपासून एवढा आग्रह का करताहेत की,' दिसामाजि वाचित जावे!

# घटस्थापना- स्त्री शक्तीस्वरूप

## घटस्थापना

शारदीय नवरात्रोत्साची सुरुवात आज घटस्थापनेपासून होत आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसात देवीच्या नऊ रुपांची पूजा केली जाते. खरं पाहता आपल्या हिंदू संस्कृतीमधील प्रत्येक सणाचा एक विशेष उद्देश असतो. नवरात्री हा उत्सव शक्तीस्वरुपाशी निगडीत आहे. देवीचे नऊ रुपे, तिची शक्ती आणि महती यांचा या निमित्ताने जागर केला जातो. खासकरुन मला असे वाटते की, नवरात्री हा सण समाजातील स्त्रीयांचे अस्तित्व व स्रीत्वाची जागृती करणे हा या सणाचा उद्देश असावा. नवरात्रीनिमित्ताने बहुतांशी नोकरवर्गीय स्त्रियासुद्धा उत्साहाने नऊ दिवस नऊ रंगाच्या साडया परिधान करुन सण साजरा करताना दिसतात. या काळामध्ये देवी सत्व प्रचंड प्रमाणात जागृत असते असे म्हणतात. हा सण देवीच्या विविध रुपातील वैशिष्ट्यांची प्रचिती करुन देवून स्त्रीशक्तीची ओळख करुन देतो.

जसे, शारदीय नवरात्रीमध्ये पहिल्या दिवशी शैलपुत्री देवीची पूजा केली जाते व देवीकडून निरोगी आयुष्यासाठी आशिर्वाद मागितला जातो. दुसऱ्या दिवशी ब्रह्मचारिणीची पूजा केली जाते, जी भक्ती आणि आणि तपश्चर्येची जननी म्हणून ओळखले जाते. तिसऱ्या दिवशी राक्षसांचा नाश करण्यासाठी चंद्रघटा देवीची पूजा केली जाते. चौथ्या दिवशी कुष्मांडा देवीची पूजा केली जाते. या देवीने तिच्या दिव्य आणि तेजस्वी हास्याने जग निर्माण केले होते. पंचमीला मातृत्व देवी म्हणून ओळखली जाणाऱ्या स्कंदमातेची पुजा होते. सहावे रुप देवी कात्यायनीची नवरात्रीच्या सहाव्या दिवशी पूजा केली जाते, जिच्या हातामध्ये कमळ, त्रिशूल, तलवार आणि ढाल आहे. सातव्या दिवशी राक्षस संहार करणारी देवी कालरात्री पूजा केली जाते. देवी महागौरी अष्टमी किंवा नवरात्रीचा आठव्या दिवशी देवी महागौरी बैल किंवा पांढऱ्या हत्तीवर स्वार होते. सिद्धिदात्री हे दुर्गामातेचे नववे आणि शेवटचे रुप आहे. देवी सिद्धिदात्री कमळावर विराजमान असून तिच्या हातांमध्ये गदा, पुस्तक, चकती आणि कमळ आहे.

या सर्व रुपांतील बीज हे प्रत्येक स्त्रीमध्ये आहे. फक्त तिला तिच्या शक्तीची जाणीव होणे आवश्यक आहे. तीच जननी, पालनकर्ती, ज्ञानदाती अन संहारकही तीच. या सणानिमित्ताने समाजात तिच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी ती सबळ, सक्षम व्हावी, तिच्यामधील वैश्वीक मातृत्व भावनेला जागृती मिळावी, वाढत्या बलात्कांराच्या तसेच इतर अन्यायाविरुध्द भयभीत न होता स्वरक्षणासाठी मानसिक व शारिरीक दृष्टया सबळ व्हावी यासाठी घट स्थापित होणे आवश्यक आहे. या लेखाच्या निमित्ताने सर्व स्त्रीशक्तीला समर्पित काही पंक्ती,

**एकाच जन्मी जन्मतेस पुन्हा पुन्हा**
**उदरी बीज अंकुरूनी फुलवतेस जगा**
**शृंगारीले पाश जरी हे बंधनांचे**
**चैतन्यशक्ती देतेस नववंशा...!**
**मृदु कोमल हृदयी वाहतो वैश्विक ममत्वाचा झरा**
**परि सळसळत्या तळपत्या तलवारीसम भिडतेस अन्यायाला**
**अदृश्य सहस्त्रकरधारिणी तू**
**तोड नाही तुज कर्तुत्वाला...!**
**व्याघ्रांगिणी तू, जगतजननी जगदंबा**
**नमन माझे तुज या कलियुगी,**
**स्त्री शक्तिस्वरुपाला स्त्री शक्तीस्वरूपाला**

**वर्षा कदम,**
**डहाणू.**

## घटस्थापना

शारदीय नवरात्र सुरू झाला आहे. ही नवरात्र देशभरात सर्वत्र विविध पद्धतीने साजरी केली जाते. महाराष्ट्रात घटस्थापनेला महत्त्व आहे. घटस्थापना म्हणजे कलश प्रतिष्ठापन. कलश हे देवता, ग्रह, आणि नक्षत्रांचे निवासस्थान मानले जाते. कलश हे सुख समृद्धी आणि शुभकार्याचे प्रतीक म्हटले जाते. अश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापना करण्याचा प्रघात आहे. घटस्थापना म्हणजे शब्दशः अर्थ घट वाढणे होय. घटस्थापना म्हणजे शक्तीमातेची उपासना...!

शक्तीमातेची उपासना केल्याने आपल्या जीवनात समृद्धी, सौख्य, व उत्तम आरोग्य व वंशवृद्धी होते. नवरात्रासोबत येतो तो उत्साह आणि उत्सव. नऊ दिवसांच्या या उत्सवात देवी दुर्गाच्या नऊ स्वरुपांची पूजा केली जाते. शारदीय नवरात्रीचा पहिला दिवस सर्वात महत्वाचा असतो कारण त्यादिवशी घटस्थापना होते. घटस्थापनेला महानवरात्री असेही म्हणतात. पहिल्या दिवशी शैलपुत्री रूपाची पूजा केली जाते. ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी, सिद्धीदात्री अशी नऊ रूपे नऊ दिवस पुजली जातात. यंदा रविवार १५ ऑक्टोबर २०२३ रोजी घटस्थापना होत आहे.

घट स्थापना ही विधिवत करावी. घट बसतेवेळी देवीची पूजा करावी. पूजा केलेला टाक घ्यावा. अभिषेक करावा नंतर स्थापना करावी. स्थापना करण्यापूर्वी प्रथम पाट घ्यावा. त्यावर गहू पसरून पाण्याने भरलेला कलश ठेवावा. पाण्यात पैसे, सुपारी घालावी. तांब्यावर गव्हाने भरलेले लहान ताम्हन ठेवावे. त्यात देवीचा टाक ठेवावा. हळद-कुंकू गंध, फुल यांनी पूजा करावी. या दिवशी गव्हाचे महत्त्व जास्त असते. पाटापुढे शंख, घंटा ठेवावी. खाली पत्रावळ ठेवून पत्रावळीवर चाळलेली काळी माती टाकून गहू, पुन्हा माती, पुन्हा गहू पेरावेत. असे दोन तीन वेळा करावे. मध्ये पेल्यासारखे भांडे ठेवून त्यांची पूजा करावी.

यात पाणी, हळद, कुंकू वाहून फुलांची माळ करून त्यावर सोडावी. कलशाची पूजा करावी. पाटावर रांगोळी काढावी. झेंडुच्या फुलांची माळ करावी. ही फुले मिळाली नाहीत, तर अन्य कोणत्याही सुवासिक फुलांची माळ नवरात्रीत नऊ दिवस घटावर रोज एक याप्रमाणे बांधावी. शक्य झाल्यास नवरात्रीत नऊ दिवस चौवीस तास समई तेवत ठेवावी. ज्या दिवशी एका तिथीचा क्षय असेल त्या दिवशी दोन वेळा माळा घालून नऊ दिवसांच्या माळा पूर्ण कराव्यात. रोज आपण फराळाचे जिन्नस करतो, त्यांचा नैवेद्य दाखवून नंतर फराळ करावा. रोज सायंकाळी देवीची आरती, जप, पोथीवाचन करावे.

नवरात्रीत बसवला जाणारा घट हा पंचमहाभूतांचे प्रतीक आहे. ही पंचमहाभूते म्हणजे पृथ्वी, जल, आप, तेज आणि वायू. घटस्थापनेच्या निमित्ताने आपण पंचमहाभूतात वसलेल्या देवांना आपल्या घरात येण्याचे आमंत्रण देतो. या चराचरात सामावलेली ऊर्जा घटस्थापनेमुळे आपल्या घरात एकवटते आणि त्या सकारात्मक ऊर्जेच्या प्रभावाने वास्तुदोष दूर होतात. घरात शांतता नांदते. देवीच्या आगमनाबरोबर घरात नवचैतन्य, उत्साह, ऊर्जा यांचा समावेश होतो.

नवरात्रात अनेक ठिकाणी सार्वजनिक नवरात्रोत्सव साजरा करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवाला एक आगळंवेगळं महत्त्व आले आहे. नवरात्रात गरबा, रास दांडिया असे स्वरूप अनेक वर्षे आपण पाहत होतो. स्थानिक पातळीवर नवरात्र काही मंदिरे आदी ठिकाणी साजरा व्हायचा परंतु गेल्या काही वर्षात सिंधुदुर्गात सार्वजनिक रित्या नवरात्र अनेक मंडळे, युवावर्ग देवीची नऊ दिवस स्थापना करून साजरा करताना दिसतात. यात गरभा, दांडिया एवढेच नव्हे तर अनेक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जातात. यात प्रामुख्याने नृत्य, भजन स्पर्धा, दशावतार लोककला, असे अनेक कार्यक्रम सादर होतात, त्यामुळे स्थानिक मुलांच्या कलागुणांना वाव मिळतो. एकत्रित गरभा, दांडिया खेळून सणाचा आनंद द्विगुणित केला जातो. सणाच्या काळात दांडिया, गरबा आदी नृत्यांमुळे वेगवेगळ्या समाजातील लोक एकत्र येतात त्यामुळे एकोपा वाढीस लागतो. सुवासिनी स्त्रिया देवीची खणा नारळाने ओटी भरून आपली मनिषा देवीला सांगतात. नऊ दिवसांच्या उत्सवानंतर प्रतिष्ठापना केलेली देवीची मूर्ती वाजतगाजत, टाळ मृदंगाच्या गजरात मिरवणुकिने जलाशयात विसर्जित केली जाते.

## आईचे ऋण

आई आणि मुलाचे नाते हे जगातले सर्वात् सुंदर आणि सन्माननीय आहे. आई आपल्या प्रेमाने मुलांचे पालनपोषण करते. जगातील प्रत्येक गोष्टीला आईची उपमा असते म्हणूनच प्रत्येक गोष्टीमध्ये आपल्याला आई दिसत असते. आई प्रत्येक घटनेमध्ये दुःख व यातना सहन आपले कर्तव्य कधीच महत्त्व अपार आहे. ती आपली काळजी घेते करते. तरीसुद्धा ती विसरत नाही. म्हणून आईचे आपल्याला जन्म देते. आणि आपल्याला जगण्याचा मार्ग दाखवते. आईचे प्रेम ही जगातील सर्वात शुद्ध आणि निःस्वार्थ भावना असते.



आई आपल्याला लहानपणापासूनच प्रेम, काळजी आणि संरक्षण देते. ती आपल्याला चांगले वाईट शिकवते. आपल्याला आपल्यालाशिस्त लावते आणि स्वतः वर विश्वास ठेवण्यास प्रोत्साहित करते. आई आपल्याला आपल्या जिवनातील प्रत्येक टप्प्यावर साथ देते. आपले जीवन आपल्या आईमुळे उज्ज्वल बनते. आई आपल्याला संस्कारातून अनेक गोष्टी शिकवत असते. कदाचित देवाकडे आपल्याला कधी माफी नसेल पण आईच्या दरबारात मात्र आपल्या चुका सुधारण्यासाठी तिचे प्रयत्न असतात. आई आपल्या मुलांवर कोणतेही संकट येऊ देत नाही. म्हणून आईला देवाचे रूप मानतात. अर्हिविना आफ्लो पण आई फक्त एकच स्वप्न पाहते. ते म्हणजे आपल्या मुलांनी खूप मोठं होऊन समाजात मापले नाव मोठे करावे. आपण जीवनात कितीही शिकलो तरी आपण आईकडून जे काही शिकतो ते इतर कोणाकडूनही शिकू शकत नाही. जगातील प्रत्येक व्यक्तीची गुरु ही फक्त 'आई' आणि 'आईच' असते .

आई ही आपल्या जीवनात सर्वात मौल्यवान व्यक्ती आहे. मी काही लोक असे बोलताना ऐकले आहे की " माझी आई माझ्याकडे राहते" पण मला असे वाटते की आपली आई आपल्याकडे कधीच राहत नाही. आपणच आईकडे राहतो आपल्या जन्मापासून ! नसेल कदाचित देवाला प्रत्येक घरात जाता येत म्हणून देवाने प्रत्येक घरी आईला पाठवले असेल.आई म्हणजे देव पृथ्वीवरचा आई म्हपाजे साठा सुरवाचा, आई म्हणजे मैत्रिण गोड, आई म्हणजे मायेची ओढ......!



**कु.अमृता विक्रम पोळ**
शाळा: के. एम. एस. डॉ. शिरोडकर हायस्कूल,
परेल.
इयत्ता : ९वी / अ

# मालवणी संस्कृती' - 'होवये'



**श्री धनंजय शेटये.**
**गोळवण, ता. मालवण.**

'

'ओवी' हा या शब्दाचा मालवणी प्रतिशब्द म्हणजे 'होवये'! मालवणी लग्नसमारंभात अगदी फार पूर्वीपासून 'होवयें'ची जुगलबंदी रंगली जायची. लग्नाच्या आदल्या दिवशी नवरीकडची मंडळी नवरदेवाच्या गावी विवाहासाठी राहायला जायची ' व्होकाल' ( नवरी) उकलान इली' असा शब्द प्रयोग वापरला जातो. ती रात्र 'पुण्यवचन' रात्र म्हणून रात्रभर होवये गाऊन जागविले जायचे. खरंतर आजकालच्या आगरी लोकांच्या हळदी समारंभ पेक्षा साहित्यिक मौखिक काव्यगायनाचा सुरेल कार्यक्रमच! म्हणजे 'पुण्यवचन!' आदल्या दिवशी मुहूर्ताचे भात घालताना ,पीठ दळताना गावातील बायका तालासुरात लाऊडस्पिकरवर 'होवये' गात असतात. या 'होवये' मध्ये कमालीचे शब्द सौंदर्य, शब्द चातुर्य असायचे.मजेशीर व्यंगात्मक टिका टिप्पणी असते, नव-याकडच्या बायका नवरीकडच्या माणसांवर विनोद ढंगात 'होवये' रचून गायची.

**'अशी काय होकलकारांची त्वांडा...**
**जशी काय काप्या काजीची बोंडा'**

अशा खोडी काढल्या जायच्या पण एक मनोरंजक लटकेबाज आपलेपणाही ओतप्रोत भरलेल्या ओव्या असायच्या. मध्य रात्रीच्या शांततेत अशा ओव्या अगदी स्पष्टपणे ऐकायला मिळत असे. नवरी मुलीच्या बापाची भावनिक अवस्था ओवीतून ऐकताना डोळे ओले व्हायचे.

मराठी लोकसाहित्यात स्त्रियांचे भावविश्व सांगणारी 'ओवी' विशेष मान्यता पावलेली दिसून येते. या ओव्या रचना-या स्त्रिया या अशिक्षित किंवा कमी शिकलेल्या असतं. मात्र ग्रामीण भागातील आपले रोजचे जीवन, त्रास, सुख- दुःख हे ओवीच्या चार चार ओळीत मांडणे त्यांना जमले आहे असे दिसून येते. ओवीला गेयबद्धता असते. कोणतेही घरातील काम करता करता या ओव्या महिला गुणगुणत असत. त्याची भाषा सहज सोपी असून त्याचा अर्थही लेगच असा असतो. ओवीमध्ये कुटुंबातील नातेवाईक, पौराणिक देवदेवता, त्यांच्या गोष्टी अशा विषयांची गुंफण केलेली दिसून येते.

'होवये' हा एक मालवणी मौखिक कवितेचा प्रकार आहे. अनादिकाळापासुन अस्तित्वात आहे.मौखिक असल्याकारणाने मालवणी 'होवये' लिहिलेल्या तशा फारशा उपलब्ध नाहीत. तेव्हाची पुरातन 'होवये' गायन परंपरा, मालवणी माणसाची ही काव्यगायनाची ठसकेबाज कला काळाच्या पडद्याआड हरवते की काय असा वाटू लागते. जरी ७व्या शतकात महानुभावपंथात मराठीचे आद्यकवी मुकुंदराज यानी लिखित सावरुपात 'ओवी'ची सुरवात केलेली असली तरी अशी 'ओवीबद्ध' रचना करतानाच्या काळातच मालवणी मौखिक 'होवये'जन्माला आलेल्या असतीत. पुढे बाराव्या शतकात ज्ञानेश्वरांच्या 'भावार्थदिपीका' म्हणजे 'ज्ञानेश्वरीची' रचना 'ओवी'ची असल्या कारणाने जनसामान्यांत 'ओवी' काव्य प्रकाराचे प्रचंड आकर्षण होते आणि 'ओवी'चा अपभ्रंश म्हणजे 'होवये'.मराठी, मालवणी माणसं उच्चाराचे अपभ्रंश करण्यात माहीर असतात. 'प्रकाश' नाव असलं तर 'पक्या' शिवाय हाक मारणार नाही. मुंबई मध्ये behind the bazaar चा ' भेंडी बाजार' असा उच्चार करणारा तसाच 'सॅन्डहर्स्ट रोड' ला 'संडास रोड' म्हणणारा पहिला माणूस हा कदाचित मालवणीच असला पाहिजे.

गावच्या लग्नसमारंभात 'होवये' म्हणण्याची स्पर्धा असते. मालवणी बायकांमध्ये उपजत गुण म्हणजे 'होवये' म्हणणं.बहिणाबाईंच्या आधीपासूनच मालवणमध्ये 'होवये' हा काव्यप्रकार अस्तित्वात असावा. लाखो बहिणाबाई आमच्या मालवणात जन्माला आल्या असतीत पण उजेडात आल्या नसतील कधी.लग्नकार्यात बायकांच्या 'होवये' गायनाच्या चढाओढी लागतात. नव-याच्या वाडीतल्या शेजा-याच्या घरात होकलेकडची मंडळी राहाण्याची खाण्याजेवणाची सोय केलेली असते. त्या घराच्या अंगणात आदल्या रात्री पुण्यवचन दणक्यात असते.पुण्यवचनादिशी रात्री नव-याची 'कोर' केली जाते. वाडीतले बरेचजण मग फुकटात केस, दाढी करुन आपला हात वाहत्या नदीत जणू धुवन घेतात.बारा बलुतेदार पद्धतीनुसार मग हे केस नव-याच्या शेतातल्या एका आंब्याच्या नाहीतर फणसाच्या मुळात टाकायचे मग ते झाड हे बाराबलुतेदार पद्धतीनुसार त्या 'कोर' करणा-या,तर कधी मुंज समारंभात जायवळ करणा-या म्हणजे केस कापणा-या माणसाचे होते.त्याना त्या झाडाचे उत्पन्न हक्काने खायचे.अर्थात प्रत्येक गावागावानुसार या प्रथेत बदल असू शकतील. मग त्या पुण्यवचनाच्या कार्यक्रमानंतर पुर्ण रात्रभर जागरण करत बायका नटुथटुन 'होवये' म्हणत असतत. नव-याकडच्या बायका आणि होकलेकड (नवरीकडच्या) बायका एकमेकांची 'होवये'तुन उणीधुणी काढतात.'होवये' ही कला असून ती कला जगासमोर बाहेर काढायची लाज वाटत असेल तर याच्यापेक्षा मोठा दुःख नाही .वयाच्य सत्तरीकडे झुकणा-या बाईमाणसं सुद्धा पहाडी आवाजात एका ठसकेदार चालीत 'होवये', म्हणताना त्यांचं वय लावतात.

मालवणी बायकांमध्ये असणारी उपजत काव्यप्रतिभा म्हणजे 'होवये' आणि लगीन समारंभात घेतली जाणारी उखाण्यातली 'नावं' हे दोन कला म्हणजे उपजत दैवी कला असतत असा म्हणायला हरकत नाही;कारण अशिक्षित लिहिता वाचता न येणारी कधीच शाळेचे तोंड न बघितलेली बाई सुद्धा यमक, अनुप्रास, उपमा हे अलंकार वापरुन मालवणीत जी काय मौखिक 'होवये' प्रकारातली कविता म्हणते ते काय तरी अदभुत आणि अलौकिक अजब असे असते. ऐकणा-यांना 'होवये'ची चालच आकर्षून घेते.अंतर्गत कथानक पण शब्दांच्या वीणांनी दोरीसारखा पीळ देवून श्रवणीय बनवलले असते.त्यात पुराणकथांचा आधार असतोच.विनोदी रंगाढंगात हे 'होवये' लगीन कार्यात एक वेगळीच लज्जत आणतात. आजही ही कला एकदा मन लावून ऐकत राहिले तर आपल्याला त्या अलौकिक उपजत कलेचा प्रत्यय येतो. आजच्या मोबाईलच्या व्यस्त आधुनिक युगात अशा मालवणी कला सुद्धा अगदी आत्मियता ठेवून ऐकून बघा तुम्हाला मालवणी भाषा स्वर्गीय सुख मिळवून देते की नाही बघा.मनाचे दरवाजा मोकळे करुन बघा जग खूप सुंदर आहे फक्त मालवणात, तळकोकणात जन्म व्हायला हवा.मग तुम्हाला स्वर्ग म्हणजे काय आहे? ते समजेल. कारण खरे स्वर्ग असले तरी ते मालवणी कला, संस्कृती,निसर्गरम्य परिसराइतके सुंदर असूच शकत नाही.

## आठवणींच्या गोष्टी: कवी, गायक संतोष गमरे

( पान ७ वरून )

आहेत. अगदी स्टेजवर सुटाबुटात हा कवी गात असतो. खाजगी नोकरी आज मेटल इंडस्ट्रीत प्रोडक्शन मॅनेजर या हुद्यावर नोकरी करून कोकणरत्न कवी रमेश येलवे, सूरज म्युझिक चे मालक गायक प्रदीप खेत्रे , कवी गौतम सावंत कवी गायक सुधाकर सावंत, कवी भीमदास कदम, प्रमोद तांबे, कोकणरत्न साहित्यीक मारुती सकपाळ, साहित्यीक वक्ते प्रा, प्रकाश नाईक, राष्ट्रपाल सावंत या सर्वांच्या सहवासात मी घडलो हे ते नम्रपणे सांगतात. पणं कला सामाजिक धार्मिक कार्य करतांना आपल्या मूळगावात,समाजात विकासाच्या कामात ज्येष्ठ वक्तेसामाजिक कार्यकर्ते भिमराव गमरे, प्रदीप पवार,प्रभाकर धनावडे, आईं वडील, पत्नी अन्य मित्र मंडळी यांची साथ प्रोत्साहन असल्याचा उल्लेख करतात.

संस्थापक अध्यक्ष कविवर्य रमेशजी येलवे यांनी कलावंताच्या विविध मागणी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बहुजन हितवर्धक कला संस्था निर्माण केली आज या संस्थेचे ते विद्यमान अध्यक्ष असून पुस्तकं प्रकाशन कलावंताचे सन्मान त्यांना पुरस्कार, कलावंतांना मदत हे कार्य आपल्या सर्व साथीदार यांच्या साह्याने ऊत्तमपणे काम करत आहेत. सतत कार्यमग्न असणारा कार्यकर्ता कलावंत असं मी त्यांच्या विषयी नेहमी बोलतो. किती लिहिलं, गायल, समाजात काय कार्य केलं यापेक्षा यातलं नेमकं काय करायचं हा नेमकेपणा त्यांनी जाणला आहे. म्हणूनच १६५ वर्षाच्या चिपळूण मधील जानेवारी २०२३ मध्ये कोकणातील विविध लोककलांचा चार दिवस महोत्सव घेतला. त्यात आंबेडकरी चळवळीतील प्रबोधन गायन पार्टी हा कार्यक्रम संतोष गमरे आणि पार्टीने सादर करून रसिकांची मने जिंकली. त्यांचं कार्य असच जोमाने पूढे न्याव अजुनही पुढे जाण्याची खुप संधी या कलावंताला आहे. त्यांनी जो प्रबोधनाचा सामाजिक कार्याचा वसा, वारसा घेतला आहे तो पुढे चालवावा यासाठी त्यांना शुभेच्छा !

## फरक ओळखा

